

# श्री साईलीला



बाबा स्वहस्ते हंडीत भोजन तयार करीत व आपल्या हाताने प्रसाद म्हणून वाटीत.



सप्टेंबर ] कि. ६० पैसे [ १९७९



# श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

## अभिनव निबंध स्पर्धा — रोख बक्षिसे

संत चूडामणि भगवान श्रीसाईबाबांची ६१ वी पुण्यतिथी, शिरडी समाधी मंदिरातील मूर्तीच्या प्रतिष्ठापनेचा रौप्य महोत्सव व १ ऑक्टोबर विजया दशमी-दसरा श्रीबाबांचा निर्वाण दिन असा त्रिवेणी संगम साधून श्रीसाईबाबा संस्थान एक अभिनव निबंध स्पर्धा फक्त विद्यार्थ्यांसाठी जाहिर करीत आहे. ही स्पर्धा वय वर्षे आठ ते वय वर्षे पंचवीस पर्यंतच्या कोणत्याही शालेय किंवा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. स्पर्धेचे दोन गट पाडण्यात आलेले आहेत. स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्याने पुढे दिलेल्या विषयावर सुमारे चार फुलस्केप पाने एवढा निबंध लिहावयाचा आहे.

**गट क्रमांक** — [१] वय वर्षे ८ ते वय वर्षे १५

**विषय** — मी शिरडीची वारी करतो

किंवा

मी शिरडीत काय काय पाहिले.

**गट क्रमांक** — [२] वय वर्षे १६ ते वय वर्षे २५

**विषय** — श्रीसाईबाबा पुन्हा प्रगटले तर !

स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थी भक्ताने एकावेळी एकच निबंध लिहावयाचा आहे. मजकूर कागदाच्या एकाच बाजूला समास सोडून सुवाच्य अक्षरात नवीन मराठी शुद्धलेखन पद्धतीला धरून लिहिलेला असावा. ही अट न पाळल्यास निबंध कितीही चांगला असला तरी तो स्वीकारला जाणार नाही. निबंध पाठविण्याची **शेवटची तारीख २० सप्टेंबर १९७९** ही आहे. या तारखेनंतर आलेले निबंध अजिबात विचारात घेतले जाणार नाहीत.

प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे निबंध ठरलेल्या स्पर्धकास अनुक्रमे रु. ६१, रु. ५० व रु. २५ अशी रोख बक्षिसे दिली जातील. स्पर्धेचा निकाल १–१०–७९ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या श्रीसाईलीला अंकात प्रसिद्ध केला जाईल. निवडलेले तिन्ही निबंध जानेवारी १९८० चे श्रीसाईलीला मासिकात प्रसिद्ध केले जातील. स्पर्धकाने निबंधासोबत आपले संपूर्ण नाव, पत्ता, वय, शिक्षण घेत असलेली इयत्ता, शिक्षण-संस्थेचे नाव, निबंध स्वतःच लिहिलेला आहे याबद्दल आपल्या गुरुजींचा किंवा प्राध्यापकांचा दाखला सोबत जोडावा व पाकीटावर "निबंधस्पर्धेसाठी" म्हणून लिहावे.

निबंध पाठविण्याचा पत्ता—संपादक **श्रीसाईलीला**, साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४०००१४.

जगा लावावे सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥



## श्रीसाई वाक्सुधा

"तुम्ही जाणा तुमची करणी ।
मज तों अहर्निश तुमची बोलणी" ।
ऐसी बाबांची प्रेमळ वाणी ।
असेल स्मरणी बहुतांच्या ॥ ९३ ॥

नलगे आम्हां ज्ञानकथा ।
पुरे हा एक साईंचा गाथा ।
कितीही पापें असोत माथां ।
संकटीं त्राता हा आम्हां ॥ ९४ ॥

जरी न करवती पारायणें ।
तरी यांतील गुरुभक्ति-प्रकरणें ।
श्रोतांकीजे हृदया भरणें ।
नित्य श्रवणें नेमानें ॥ ९५ ॥

दिवसाच्या कोणत्याही प्रहरीं ।
वाचील नित्य हें चरित्र जरी ।
निजगुरु राजसह श्रीहरी ।
भेटेल निर्धारी भाविकां ॥ ९६ ॥

अखंड लक्ष्मी नांदेल घरीं ।
वाचितील जे निरंतरीं ।
निदान जो एक सप्ताह करी ।
दरिद्र दूरी तयाचें ॥ ९७ ॥

—श्रीसाईसच्चरित—अध्याय ३७ वा

# श्रीसाईलीला


[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे
अधिकृत मासिक ]

वर्ष ५८ वे ] सप्टेंबर १९७९ [ अं. ६



: संपादक :

**श्री. क. हि. काकरे,**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )



वार्षिक वर्गणी रु. ६-०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.



: कार्यालय :

**"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी,**
**डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.**

**पिन : ४०००१४**

**दूरध्वनी : ४४ २२ ६१**

# अनुक्रमणिका – सप्टेंबर १९७९


१) संपादकीय — ईश्वरभक्ती हीच खरी राष्ट्रीय एकात्मता
२) श्रीजनार्दन महाराज बांडेवाडीकर — प्रा. र. श्री. पुजारी
३) श्रीसाई–एक अवतार — सौ. आशा दयानंद इंगळे
४) श्रीसाई साक्षात्कार — शामा शं. पराडकर
५) श्रीसाई भजनी मन रमले — श्री. सूर्यकांत गर्जे
६) ओळखा पाहू मी कोण ? — कु. प्रज्ञा सबनीस
७) सद्गुरु सारीखा असता पाठीराखा — श्री. सुधीर जोग
८) हे शारदे वाग्विलासिनी — श्री. ग. गो. सामंत
९) श्रीगुरु राघवेंद्रस्वामी — सौ. शशिकला रेवणकर
१०) १ लक्ष २५ हजार लाडू व तितकेच मोदक — श्री. वामन पंडित
११) साई दीनांचा कैवारी — श्रीसाईदास मराठे
१२) श्रीसाईराम भजन — श्री. अण्णासाहेब लोंबर
१३) साईनाथ, साईनाथ — श्री. चंद्रकांत जोगल
१४) आरती साईबाबांची — श्री. भालचंद्र ठसाळ
१५) प्रार्थना — डॉ. मालती रहाटे
१६) श्रीसाईबाबा प्रसन्न — सौ. कमल जोशी
१७ शिरडीवृत्त–जून ७९ —
१८) साईनिकेतनची गुरुपौर्णिमा — डॉ. श्री. दि. परचुरे
१९) श्रीसाईबाबांची शिरडी छान — संजयकुमार झाडे
२०) अभिनव चित्रकला स्पर्धा —

संपादकीय –

ह. न. वि. वि.

# ईश्वरभक्ती हीच राष्ट्रीय एकात्मता

राष्ट्रीय एकात्मता, देशभक्ती, समाजसेवा असे अनेक मोठमोठे शब्द वापरून जनतेला उपदेशामृत पाजण्याचा अट्टाहास आजचे तथाकथीत पुढारी करीत आहेत. परंतु राष्ट्रीय एकात्मता, देशभक्ती किंवा समाजसेवा यांचे बीज परमेश्वर भक्तीत आहे याची ओळख मात्र खूपच थोड्यांना असलेली दिसून येते.

पुरातन काळापासून भारतात भक्तीरसाचा ओघ संथपणे वहात आहे. दक्षिणे-पासून उत्तरेकडे आणि पूर्वेपासून थेट पश्चिमेपर्यंत अनेक संत–साधू पुरुषांचे कार्य अव्याहतपणे चालूच आहे. त्या भक्तीरसामुळेच अनेक जाती धर्म स्वतःमध्ये सामा-वून आज भारत डौलाने, मानाने जगाच्या गोलार्धात उठून दिसत आहे, खुलून दिसत आहे.

संत ज्ञानेश्वरांनी तर 'हे विश्वची माझे घर' म्हणून विश्वप्रेमाचा, मानवतेचा केवढा मोठा अमोल संदेश मानवाला बहाल केला आहे. भारतातील थोर थोर व्यक्ती स्वामी विवेकानंद, स्वामी रामकृष्ण परमहंस, योगानंद, स्वामी रामतीर्थ परमहंस या सारख्या अनेकांनी परमेश्वर भक्तीचा संदेश प्रसार जगभर सातत्याने केलेला आहे आणि अजूनही होत आहे.

ज्या देशात मानवप्रेमाचे धडे दिले जातात त्याच देशात राष्ट्रीय एकात्मतेचे धडे देण्याची वेळ यावी ही अत्यंत आश्चर्याची गोष्ट आहे.

दिडशे वर्षे गोऱ्यांच्या गुलामगिरीत काढल्यामुळे भारतातील ज्ञानयोग, भक्तियोग आणि कर्मयोग यावर धुळीची पुटे बसली. भारत दारिद्र्यात खितपत पडला. पाश्चात्यांनी भारतातील संपतीबरोबरच भारतातील ज्ञानदीपांचेही अपहरण केले. पोटाच्या विवंचनेने आणि अत्याचाराने भारतीय जनता पिळून निघाली. ज्या गीतेने भारताला शिकवण दिली 'कर्तव्य हाच माझा धर्म' त्या शिकवणूकीचा विसर पडला.

—आणि राष्ट्रीय एकात्मतेचा धडा गिरविण्याची वेळ आज आम्हाला स्वतंत्र भारतीयांवर आली.

ईश्वरभक्ती, ईश्वरसाधन हेच जे राष्ट्रीय एकात्मतेचे बीज यांचे प्रात्यक्षिक स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, अरविंद महर्षि, संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराज, संत एकनाथ महाराज, तुकाराम महाराज, संत श्रीगाडगेबाबा, संत श्रीगजानन महाराज, संत श्रीसाईबाबा इत्यादींनी करून दाखविले आहे.

शेवटी प्रत्येक प्राणीमात्राला एकाच मातीत जावयाचे आहे. एकाच ध्येयाशी समरस होणे आहे. ज्यामुळे तत्त्वातून प्राणीमात्र या भूतलावर अवतरला आहे याच मूळ तत्त्वात पृथ्वीतलावरील सर्व प्राणीमात्रास जड, अचल यांना एकरूप व्हावे लागते. प्रत्येकाची पावले कळत नकळत ईश्वराकडे जाण्याचा मार्ग आक्रमीत असतात. 'पुनरपी मरणम्, पुनरपी जननम्!' करीत करीत शेवटी भूतलावरील प्राणी मोक्षपदी जात असतो.

सूर्य एकच पण त्याची किरणे, मूळ शक्ती जी परमात्तत्व एकच. त्याच शक्तीपासून निर्माण झालेली आमची ही मानव जात. घडा फुटल्यानंतर घड्यातील अवकाश अवकाशाला भिडतो त्याप्रमाणे देहरूपी घड्यातून बाहेर पडलेली शक्ती त्याच मूळ शक्तीला भिडते. या एकाच तत्त्वाचे ज्ञान, संस्कार प्रत्येक कुटुंबात लहानपणापासूनच मिळायला हवे. पूर्वी ते मिळतही होते आणि आज तेच मिळणे आवश्यक आहे.

माता शत्रुः पिता वैरी येन बालो न पाठितः
न शोभते सभामध्ये हंसमध्ये बको तथा ।

जर मातापित्यांनी आपल्या मुलांना उत्तम शिक्षण दिले नाही तर ते त्याचे वैरी होत. जसा हंसामध्ये बगळा दिसतो तसा विद्वानांच्या सान्निध्यात अविद्वान दिसतो.

अशाप्रकारे शिक्षणाचा वारसा घरातून म्हणजे मातापित्यांकडून घ्यावा लागतो आणि म्हणूनच मातृदेवो भव, पितृ देवो भव ॥ असे म्हटले जाते. प्रथम मातेकडून, नंतर पित्यांकडून कुटुंबाकडून आणि नंतर समाजाकडून प्रत्येक व्यक्तीला शिक्षण मिळालेच पाहिजे. या संस्कारातून प्रेम या भावनेचा विकास होतो. प्रेम हे संघटनात्मक असते. ते पृथकपणा नाहीसा करून मिलन घडवून आणते. प्रेमानेच आई मुलाशी एकरूप होते. प्रेमाने कुटुंब एक होते. कुटुंब नगराशी एकरूप होते आणि नंतर राष्ट्राशी एक होते.

अशी ही प्रेमाची भावना ईश्वरी भक्तीतून, संत साधनेतून फुलत असते.

# श्री जनार्दनमहाराज बांडेवाडीकर



— प्रा. र. श्री. पुजारी
१९२, सदाशिव पेठ,
पुणे ३०

● देहपातामुळे अपुरे राहिलेले तप पुरे करण्यासाठी योगिजनांना पुन्हा एक जन्म घ्यावा लागतो. भगवद्भक्तांच्या पवित्र कुळात तो त्यांना लाभतो.

पुणे जिल्ह्यातील तळेगावच्या परिसरातील ओवळे या लहानशा गावी देशपांडे घराण्यात अशाच एका 'योगभ्रष्ट' पुरुषाने १९०२ मध्ये जन्म घेतला. ईश्वरी इच्छेने प्रारब्धात लिहिलेली सर्व स्थलांतरे आणि स्थित्यंतरे एकाद्या सामान्य माणसाप्रमाणे भोगली. अखेर १९७७ साली त्रिपुरी पौर्णिमेस पुणे परिसरातील ऐतिहासिक खेड-शिवापूर जवळील बांडेवाडी या लहानशा गावी जीवनमुक्त, पूर्णयोगी अवस्थेत आपली प्राणज्योत अनंतात विलीन केली.

श्रीमहाराजांच्या मातापितराना एकूण आठ अपत्ये झाली. श्रीमहाराजांचे वेळी गरोदर असताना त्यांच्या मातोश्रीना अत्यंत रोमांचकारी, आनंददायी अशी दैवी स्वप्ने पडत. या थोर संताच्या आगमनाची ही पूर्वसूचना होती. अत्यंत कडक रीतीने आजन्म आचरिलेल्या व्रतवैकल्यांचे त्या माउलीला मिळालेले हे दैवी वरदानच होय.

बालपणी श्रीमहाराज अत्यंत विरक्त, मानवी व्यवहारापासून अलिप्त, पराकाष्ठेचे ईश्वरनिष्ठ आणि आपले काम विलक्षण एकाग्रबुद्धीने करणारे होते. भोरच्या पंतसचिवानी सहा पिढ्यांपूर्वी त्यांच्या घराण्यास दिलेल्या राम-लक्ष्मण-सीता यांच्या मूर्तींची नित्यनैमित्तिक पूजा आणि रामजन्मोत्सव यांच्यामुळे त्यांच्या बालमनावर रामभक्तीचे संस्कार बालपणीच झाले.

श्रीमहाराजांचे पाच इयत्तांपर्यंतचे शिक्षण पुण्यानजीकच्या पौड गावी आपल्या शिक्षक मामांच्या देखरेखीखाली झाले. तेथे त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेचा प्रत्यय सर्वांना प्रथम आला. रामरक्षा, भीमरूपी स्तोत्र, पुरुषसूक्त, व्यंकटेशस्तोत्र, संध्या

या गोष्टी त्यांनी केवळ एक दोन दिवसाच्या अध्ययनातच आत्मसात केल्या. इतकेच नव्हे तर वयाच्या आठव्या वर्षी मुंजीनंतर संध्येबरोबरच रोज एक हजार गायत्री जपही ते करू लागले.

पौड येथे विद्यार्थीदशेत असतानाच श्रीमहाराजांच्या अंगी असलेले उत्तम शिक्षकाचे गुण हेरून पुणे येथे फायनल होताच त्यांच्या मामानी त्यांना शिक्षकी पेशा स्वीकारण्याचा सल्ला दिला. त्यामुळे कराची येथील प्राथमिक मराठी शाळेत १९१९ साली श्रीमहाराज शिक्षक झाले.

व्यवसायातील गरजेनुसार पुढे श्रीमहाराज थर्ड-इयर ट्रेंड झाले. यथावकाश डेप्युटी एज्युकेशन इन्स्पेक्टर झाले, पण त्यांनी आपली अध्यात्मसाधना सोडली नाही. उलट जीविताचे एकमेव ध्येय मानून, गुपचुपपणे, तीव्रपणे, सर्वस्व पणाला लावून, अविवाहित राहून ती पुढे चालू ठेवली. मातृपितृ घराण्याकडून आलेला थोर अध्यात्मिक वारसा, वेदकाळात मांडवी ऋषींनी तप केलेल्या डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या ओवळे गावीचा जन्म आणि उग्र तपस्या यामुळे श्रीमहाराजांना यथाकाल आपल्या साधनेत उत्तम यश प्राप्त झाल्यास नवल नाही.

गरुड आणि हनुमंत यांच्याप्रमाणे बालब्रह्मचारी राहून आजन्म ईश्वरसेवा करण्याची प्रतिज्ञा श्रीमहाराजांनी वयाच्या आठव्या वर्षी केली. वयाच्या तेविसाव्या वर्षी आळंदीस गेले असताना "मी देखील श्रीज्ञानेश्वरमाऊली आणि श्रीनृसिंह-सरस्वती यांच्याप्रमाणे समाधी घेणार" अशी प्रतिज्ञावाणी उच्चारली. या दोन्ही प्रतिज्ञा त्यांना प्रिय असलेल्या रामरायाने अखेरीस पुऱ्या केल्या असेच म्हणता येईल.

वयाच्या सतराव्या वर्षी श्रीमहाराजांची योगसाधनेची बैठक चार तासांची होती. पुढील काही महिन्यातच ती आठ तासांची झाली. काशीस गंगेच्या घाटावरील रामकुंडातील कमरेएवढ्या पाण्यात उभे राहून नित्य आठ तासांचे पुरश्चरण श्रीमहाराज करीत. अशा वेळी पाण्यातील माशांनी त्यांचे दोन्ही पाय कुरतडून रक्तबंबाळ केले तरीही ते तिकडे लक्ष देत नसत. इतकेच नव्हे तर त्यावर काही औषधोपचारही करीत नसत. उलट त्यांची सर्व साधना आठ आठ तास, तर कधी रात्र रात्रभरही उभ्यानेच धोतराच्या एका सोग्याने डोके व चेहरा झाकून, मानेजवळ गाठ मारून अव्यग्रपणे चालू असे.

या खडतर योगसाधनेच्या जोडीस सुटीच्या दिवसात कराचीहून काशीस जाऊन श्रीमहाराजांनी पंडित राजेश्वरशास्त्री द्रवीड यांच्याकडे ऋग्वेदी शाखेचे वेदाध्ययन केले. तैलबुद्धीमुळे याही शाखेत अल्पावधीतच ते पारंगतही झाले.

अशी खडतर तपस्या चालू असतानाही श्रीमहाराजांचे आपल्या पत्करलेल्या पेशाकडे कधीही दुर्लक्ष झाले नाही. विद्यार्थ्यांना फावल्या वेळात ते मोफत शिकवीत. प्रौढांचे वर्ग ते विनामूल्य चालवीत. खाडीतील समुद्राचे काठावर रात्रीच्या वेळी एका पायावर आठ आठ तास तप करणारी, गोपालकृष्ण मंदिरातील मूर्तीकडे तासन् तास वेड्याप्रमाणे पाहात बसणारी ही लोकविलक्षण व्यक्ती कराची ते मुंबई या तीन दिवसांच्या बोटीच्या प्रवासात पाण्याचा एक थेंबही तोंडात न घालता बसून राहिली तर काहीच आश्चर्य नव्हे. विहित कर्मास अनुसरूनच ते सर्व असे.

१९३०-३१ सालीच म्हणजे वयाच्या अवघ्या अठ्ठावीस एकोणतीसाव्या वर्षीच श्रीमहाराजांनी शिजलेले अन्न खाण्याचे सोडून दिले. एका ओंजळीत मावेल इतकीच कच्ची हरभऱ्याची डाळ, थोडेसे शेंगदाणे, खोबरे-गूळ खाऊ लागले. हे सर्व मिळून रोजचा आहार फक्त अर्धा किलो होता. आयुष्याच्या शेवटच्या दहा वर्षांत तर त्यांनी हेही बंद केले. फक्त एक कप दूध आणि केळ्यासारखे एखादे फळ यावरच सबंध दिवस कंठू लागले.

पाकिस्तानच्या निर्मितीनंतर १९४८ साली श्रीमहाराज पुण्यास नातेवाईकांकडे परत आले. पुढे थोड्याच दिवसात त्यांनी खेड-शिवापूरच्या शाळेत शिक्षकी पेशास पुन्हा सुरुवात केली.

फाळणीच्या काळातील कराची येथील जातीय अत्याचारप्रसंगी ईश्वरी सामर्थ्याच्या प्राप्तीमुळे श्रीमहाराजांनी अनेक निरपराधी कुटुंबांचे आणि व्यक्तींचे रक्षण केले. त्यांच्यातील ईश्वरी तेजाचा साक्षात्कार या प्रसंगाने पटल्यामुळे कराची येथील त्यांचे द्वेष्टेही अखेर त्यांचे भक्त झाले.

खेड-शिवापूर येथे तन-मन-धनाने शैक्षणिक कार्य करीत असताना श्रीमहाराजांनी आपला मुक्काम बांडेवाडी या खेडेगावाजवळील रानातील एका पुरातन शिवालयात ठेवला. पहाटे तीन वाजता उठून, जंगलासारख्या प्रदेशातील एकांतपूर्ण 'सप्तधारा'वर स्नानादी आटोपून, श्रीनागेश्वराची पूजाअर्चादी आटोपून, नागेश्वर मंदिरात ते उभ्याने पुरश्चरण करीत. मग बांडेवाडी गावात जाऊन तेथील मारुतीला स्नान घालीत. अशा प्रकारे श्रीमारुतिरायांची अनेक वर्षे पूजा केल्यानंतर एक दिवस त्यांना श्रीमारुतिरायानी दर्शन देऊन सांगितले, "गेली सातशे वर्षे मी माझ्या स्वामींची ( म्हणजे श्रीरामरायांची ) वाट पाहात येथे उभा आहे. तरी अन्यत्र कोठेही रामाचे मंदिर न बांधता माझे समोरच स्वामींची स्थापना कर."

या आदेशानुसार श्रीमहाराजांनी त्या ठिकाणी श्रीरामाचे मोठे मंदिर बांधले. त्यात श्रीमारुतिरायांचे समोरच राम-लक्ष्मण-सीता यांच्या मूर्तींची स्थापना १९५८

साली केली. श्रीमहाराजांना प्रत्यक्ष दर्शनात मूर्ती जशा दिसल्या तशाच त्या घडविण्याचा प्रयत्न शिल्पकाराने केला.

अशा रीतीने निवृत्तीनंतर श्रीमहाराजांनी आपला सर्व वेळ या उपासना केंद्राशी निगडीत केल्यामुळे अल्पावधीतच दैवी शक्तीचा प्रत्यय त्या परिसरातील शेकडो व्यक्तींना येऊ लागला. इतकेच नव्हे तर श्रीरामरायांबरोबरच श्रीमहाराज हे हजारो दुःखार्तांचे एक जिव्हाळ्याचे श्रद्धास्थान होऊन बसले. तथापि श्रीमहाराजांनी कधीही कोणत्या एका गोष्टीचे श्रेय स्वतःकडे घेतले नाही. फार काय, कोणासही त्यांनी स्वतःस कधी साधा नमस्कारही करू दिला नाही.

श्रीमहाराजांनी आपल्या हयातीत नामजपावर भर देऊन हजारो माणसांना नामाची गोडी लावली. पूजाअर्चा, कथाकीर्तन, उत्सव, प्रवचन याप्रमाणेच त्यांनी त्या परिसरातील अशिक्षित जनतेकडून नामाचे सप्ताह करवून घेतले. स्वतःप्रमाणेच गावातील स्त्रिया, पुरुष, मुले यानाही वाणी–लेखणी–करणीद्वारे हीच एक उपासना दिली.

आपल्या महानिर्वाणाआधी एक वर्ष श्रीमहाराजांनी स्वतःच्या देहविसर्जनाची कल्पना गावकऱ्यांना दिली. ईश्वराचे कृपासामर्थ्य, मानवी देहाचे क्षणभंगुरत्व याविषयीच ते बोलू लागले. अखेर १९७७ साली त्रिपुरी पौर्णिमेस त्यांनी देह ठेवला.

श्रीमहाराजांचा दिव्य देह त्यांच्या इच्छेप्रमाणे बांडेवाडीच्या गावकऱ्यांनी एक समाधी बांधून घेऊन तिच्यात यथाविधी ठेवून दिला. श्रीराम जयराम जय जय राम अशा नामघोषात श्रीमहाराजांचा देह रामाचरणी विसावत असताना जमलेल्या हजारोंच्या डोळ्यांना विरहाच्या, भक्तिप्रेमाच्या धारा लागल्या. ईश्वरी सेवेची जनता-जनार्दनाने दिलेली ही पावतीच होय.

श्रीक्षेत्र सज्जनगड किंवा गोंदवले यांच्याप्रमाणे बांडेवाडी गाव श्रीजनार्दन महाराजांमुळे मोठे क्षेत्र म्हणून नावारूपास येईल यात संशय नाही.

## श्री. नेरॉय यांची भेट

मुंबईचे साईभक्त व प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. डी. डी. नेरॉय यांना श्रीसाईबाबांचे १९१० साली टिपलेले एक छायाचित्र उपलब्ध झाले. त्या चित्राचा ठसा ते श्रीबाबांच्या ६१ व्या पुण्यतिथीनिमित्त येत्या ऑक्टोबरच्या श्रीसाईलीलेच्या मुखपृष्ठावरून समस्त साईभक्तांना देत आहेत.

# —श्रीसाई–एक अवतार—

—सौ. आशा दयानंद इंगळे
जल मंदिर सोसायटी १३।१ आंगुरनगर,
गोरेगाव, मुंबई ६२

● आपल्या भारतभूमीचे जसे सुजलाम् सुफलाम् म्हणून कौतुक केले जाते, त्याचप्रमाणे संत निर्मितीच्या बाबतीतही कौतुक करावयास हवे. कारण एका संताचा अस्त होतो तोच दुसरा संत उदयास येतो. अशी संत परंपरा आज कित्येक युगे अव्याहत चालूच आहे हे ह्या भारतभूमीचे भाग्यच नव्हे काय ? तुकाराम महाराज तसेच समर्थ रामदास ह्या समकालीन संतानंतर काही वर्षे संतनिर्मितीच्या परंपरेत खण्ड पडला आणि समाजरचनेची घडीच विस्कटली. हिंदु आणि मुसलमान ही दुही बळावली. आता मात्र संत व्हावयास पाहिजे म्हणून संतसज्जन अंर्तमनात अतिशय शोकाकुल झाले. अशावेळी दुःखाच्या परिमार्जनासाठी सद्धर्माच्या उत्थापनासाठी दुर्जनांच्या विनाशासाठी युगायुगामध्ये अवतार घेणारा त्राता निर्माण झाला.

हिंदु काय किंवा मुसलमान काय ? धर्म निरनिराळे असले तरी जात मात्र एकच. माणूस जात ! राम आणि रहीम याच्यात फरक नाही. ह्या परमेश्वर वादाचे विचार पटवून देणारा अद्वितीय द्रष्टा निर्माण झाला. ना जात ना पात. जातीय वादाचे कोणतेच आवर्त शिल्लक न ठेवता धार्मिक वादाने त्रस्त झालेल्या सद्धर्माच्या बनतेला आनंदाची मेजवानी करण्यास जनताजनार्दनाचे तत्व बरोबर घेऊन साक्षात् परमेश्वर मानवरूपाने भूतलावर स्वैर संचार करू लागला. " हरि आला रे, हरि आला। गोदेकाठी हरि आला ॥ "

जातीचा, कुळाचा जनक-जननीचा काहिही थांगपत्ता नसलेला एक तेजस्वी फकीर पवित्र गोदातीरी कोपरगाव तालुक्यात शिरडी क्षेत्री अवतीर्ण झाला. जगाच्या बंदीवासात असलेल्या असंख्य संत सज्जनांना अपूर्व ज्ञानामृताचे सचैल स्नान घडवणारे साक्षात् परब्रह्म शिरडीत प्रकटले. ह्या अवताराला 'साई' ह्या नामाभिधानानं भूषवले.

आपल्या सुरेल वेणूवादनाने अखिल सृष्टीला भारावून टाकणारा श्रीहरी ह्या अवतारात आपल्या अमृत वाणीन मंत्रमुग्ध करु लागला. शिरडीला सगुण भक्तीची गोड पहाट फुलली इथला अणुरेणु ईश्वराच्या अस्तित्वाची ओळख करून देऊ

लागला. जातिभेद विसरून सारे एकत्र येऊ लागले. स्वतः बाबा हिंदु की यवन ह्या जातीयवादाने पछाडलेले कित्येक लोक श्रीसाईंच्या सगुण दर्शनाने हरखून गेले. त्या शुभ दर्शनाने त्यांच्या मनातली अशुभ शंका गळून पडली. केवळ दर्शनाने मनाचा कायापालट झाला. कारण साऱ्या साधनेची सिद्धी इथं सामावलेली आहे. जड मूढांच्या आत्म्याला जगवणारं संजीवन बाबांच्या नेत्रातून अखंड पाझरत आहे. इथे माणसांच्या मनातलं माणूसपण जागं होतं. धर्मवादाचे विचार शिथील होतात, आणि प्रभुदर्शनाचा अमाप आनंद घडतो.

आज बाबा समाधिस्थ होऊन साठ वर्षे होत आहेत. पण त्या पत्थराच्या मूर्तीचे दर्शन घेताना अजुनही वाटतं की बाबांची ही सगुण मुर्ती आपल्याशी आनंदाचं हितगुज करीत आहे. इथे असलेल्या त्यांच्या पवित्र समाधीतून साई आपल्या येणाऱ्या भक्तजनांचे मनोगत अचूक ओळखून त्याप्रमाणे संकेत करीत आहेत. तेच जिवंत भाव ह्या मूर्तीतून आपल्या दृष्टोत्पतीस येतात आणि माणूस क्षणभर स्वतःलाच विसरून जातो. त्याच्या दृष्टीत अपार करूणा आहे, वात्सल्य आहे. वाटतं मनात कुढत असलेल्या वेदनेच्या चातकाला साई दर्शनाचा अमृत मेघच भेटला आणि आपोआपच हृदयातील आर्तता साईनाथांच्या सद्भाव स्वरूपाला जाऊन भिडते. मग वाटतं की ह्या जड देहाची शिळा होऊन इथंच रहावं म्हणजे मग युगानुयुगे इथून पुन्हा कधी हालायलाच नको. साईनाथांच्या कृपाकटाक्षाचं अमृत स्नान उपभोगीत असंच अविरत इथंच उभं रहावं.

देवाच देवपण इथं सामावलेलं आहे, की ज्याला पहाताना माणसाच्या मनातलं माणूसपण अश्रुरुप घेऊन टपटप ओघळू लागतं मनाचे विकल्प सरतात आणि इंद्रिये अंतर्मुख बनून विषय विन्मुख होतात. ज्याच्या केवळ पद स्पर्शाने शिरडीची भूमि पवित्र झाली आणि वास्तव्याने ह्या शिरडी गावाचे पवित्र क्षेत्र बनले. तोच हा परमेश्वराचा अवतार म्हणजे साई होय. धन्य तो साई; धन्य ती शिरडी आणि धन्य धन्य तेथील लोक असे उद्गार अभावितपणे आपल्या मुखावाटे बाहेर पडतात आणि वाटतं की शिरडीला दररोज धावणारी ही वाट देखील किती भाग्यवान् आहे! किती धन्य आहे! श्रीसाई सच्चरीत्रातही लेखकाने म्हटले आहे की—

धन्य शिरडीचे तृणपाषाण। अनायासे जया अनुदिन।
घडले बाबांचे चरण चुंबन। पदरजधारण मस्तकी ॥ (अ. ४ ओ. ५८)

खरोखरच शिरडीची पुण्याई थोर म्हणूनच श्री साईबाबा येथे जगदोद्धारासाठी अवतरले आणि असंख्य दुःखी पिडीतांना दुःखमुक्त केले तसेच जिज्ञासूंना ज्ञानदान

आणि मुमुक्षूकांना कृपादान केले. प्राणि कितीही आपद्ग्रस्त असो परंतु जेव्हा तो साईबाबांकडे तो धाव घेतो तेव्हा—

तत्काळचि लाभ होतो। प्राणी संसारी सुटतो।
संशय अवघाचि तुटतो। जन्ममरणाचा ॥ (दा. द. ६ स. ९)

असा अनुभव प्रत्येकास येतो. मात्र आपले मन संशयरहीत पाहिजे. नाहीतर—

वेर्थ संशयाचा देव। वेर्थ संशयाचा भाव।
वेर्थ संशयाचा स्वभाव। सर्वकांही ॥ (दा. द. ५ स. १०)

पण इथे संशयाची निवृत्ती होते, तर्क आंधळा होतो, बोलणं संपते व सान्या चित्तवृत्ती बहरून येतात. वाटतं की अनुपम्य सुखाचा ठेवाच प्राप्त झाला. हा अनादि निर्गुण आपल्या कृपाकटाक्षाच्या योगे असंख्य भक्तजनांना भाग्यवान् करीत आहे. हा साई म्हणजे सुखनिधान आहे. एरव्ही सर्व वस्तु नाशिवंत, त्यात सुखाचा लवलेशही नाही.

जो परत्रीचा आधार। कि ते विश्रांतीची थार।
नां तरी सुखाचे माहेर। सुखस्वरुप ॥ (दा. द. ७ स. १)

असे हे पावनांचे पावित्र्य म्हणजे साई, कृपेचे कृपाछत्र म्हणजे साई म्हणूनच त्याच्या कृपेची प्रभुपाखर एवढाच आपला निवारा आहे. त्याची चरणसेवा एवढंच स्वप्न आहे तर त्याचं सगुण मुखदर्शन एवढीच उत्कट आकांक्षा आहे.

अरुप अलक्ष अगोचर। अच्युत अनंत अपरांपर।
अदृश्य अतर्क्य अपार। ऐसी नामे ॥ (दा. द. ७ स. २) असा विविध नामे विविध रुपे नटलेला परमेश्वर तोच हा साई अवतार की जे—

वैष्णवांचे हे माहेरघर। उदारांचा हा उदार।
परमार्थ कर्णाचा अवतार। साराचे सार हा साई ॥
(सा. स. अ. ४ ओ. ४५)

किं ते भवार्णवीचे तारु। बोधे पाववि पैलपारु।
महा आवर्ती आधारु। भाविकांसी ॥ (दा. द. ७ स. १)

# — श्रीसाई साक्षात्कार —

—श्यामा शं. पराडकर
पाध्ये वाडा १८९० मारुती आळी, रत्नागिरी.

● एप्रिल १९७८ मधील गोष्ट. विष्णू घरात नाही असे पाहून मी व माझ्या मोलकरणीने घर झाडावयास काढले. मी साईभक्त असल्याने माझे पुढचे खोलीत बाबांचे अनेक फोटो आहेत त्यांचे बाजूचा कचरा आपण स्वतः झाडावा या हेतुने मी स्टुलावर चढले व पाय उंचावून झाडू लागले जरा कुठे केरसुणी मारली असेल तोच माझा पाय निसटला व मी धाडकन् खाली पडले. डोक्याला थोडासा मार बसला पण कमरेपासून पायापर्यंत जी कळ गेली त्यामुळे मला उठता येईना की बसता येईना. मोलकरणीने कसेबसे मला कॉटवर आणून झोपविले. त्याच्या आधी काही दिवस माझी मैत्रिण सौ. उषा अधिकारी माझेकडे येऊन म्हणाली होती की माई, बरेच दिवस शिरडीला जाऊन झाले. २।३ दिवस जाऊन येऊ या का ? मी नाही म्हटले होते. त्याची मला आठवण झाली. श्रीबाबांच्या दर्शनाला आपण नाही म्हटले त्याची तर ही शिक्षा नव्हे ! मला अक्षरशः रडू आले. विष्णू कामावर जाणार मी घरात एकटी. पाय हा असा दुखावलेला. काहीं सुचेना. विष्णूने आपल्यापरीने येथील निरनिराळ्या डॉक्टरांना पाय दाखवला औषधोपचार केले. जमेल तशी माझी सेवा केली अखेरीस माझ्या मोठ्या दोन बहिणी मुंबईला असतात त्यांचेकडे बोरिवलीला नेऊन मल पोचविले. दुसरे दिवसापासून दवाखान्यांचे उंबरठे झिजविणे सुरु झाले. माझी बहीण डॉक्टरीण असल्याने माझा लवकर नंबर लागला व तपासणी झाली. फोटो काढले त्यात कमरेचे ऑपरेशन करावे लागेल असे डॉक्टरांनी निदान केले. मला ब्रम्हांड आठवले. गेली कित्येक वर्षे मी साईबाबांची भक्ती करीत आहे. मी कधी कोणाच्या आल्या गेल्यात नाही. जमले तर कुणाचे भलेच करायचे मग ही जबरदस्त शिक्षा मला का ? मला सारखे रडू येत होते. मी एकसारखी बाबांची करुणा भाकत होते. बोरिवलीहून रोज वाहनाने हॉस्पिटलमध्ये जायचे इंजक्शन घ्यायचे व घरी यायचे यातच कितीतरी वेळ निघून जाई. त्यात ऑपरेशन केलेच पाहिजे असे डॉक्टर म्हणतात. काय करावे ? मी मनाने व शरीराने दुबळी. आपल्या साईबाबा- शिवाय यातून आपल्याला कोण तारून नेणार ! मी त्यांचे स्तोत्र रोज ८ वेळा असे ८ दिवस वाचून काढले. साईनामाचा जप एकसारखा सुरू ठेवला. साईसचरित मोठी पोथी वाचली, तशातच डॉक्टरानी ऑपरेशनचा दिवस ठरवला. माझ्या

अंगाला दरदरून घाम सुटला. दुसऱ्या दिवशी पहाटे दवाखान्यात जावयाचे होते. मला रात्रभर झोप लागेना. पण मध्येच कधीतरी डुलकी लागली तेव्हा मला कळून आले की बाबा माझ्या पलंगावर बसले आहेत आणि कृपाळू दृष्टीने मजकडे पाहून विचारत आहेत, "काय बाळ, बरं वाटतंय ना आता? काही घाबरू नकोस तुझे ऑपरेशन करावे लागणार नाही." त्यांचे ते आश्वासनपर बोल आणि माझ्या सर्वांगावरून फिरविलेला अभयहस्त यांनी माझे शरीर रोमांचित झाले. काही वेळाने मी जागी झाले. आता माझ्या मनात भीतीचे नाव नव्हते. मी पुन्हा काही वेळाने निर्धास्त मनाने झोपी गेले. दुसऱ्या दिवशी मी मोठ्या ताईसह दवाखान्यात गेले. तेथे गेल्यावर डॉक्टर म्हणाले थांबा मी आधी तुम्हाला पुन्ह एकदा तपासतो आणि मगच ऑपरेशनचे ठरवू. त्यांनी पुन्हा माझी कसून तपासणी केली आणि आश्चर्याने म्हणाले, "अहो बाई, यांचे ऑपरेशन करावयाची जरूरी मला वाटत नाही. नुसता पट्टा बांधला की काम भागेल." डॉक्टरांचे बोल ऐकताच सर्वांच्या जिवात जीव आला. गेले काही दिवस चिंताक्रांत झालेली मंडळी आनंदित झाली. आम्ही सर्वच भावंडे साईभक्त असल्याने त्यांचीच ही किमया आहे हे सर्वांनी जाणले. माझ्या पलंगावर बसून प्रत्यक्षपणे मला दर्शन व दिलासा दिल्याचे मी कुणाहीजवळ बोलले नव्हते. माझे हृदय भरून आले बाबांनी मला दिलेले आश्वासन पाळले होते. मी ऑपरेशनच्या दुष्ट चक्रातून सुटले होते. आता पट्टा बांधावयाला लागला तरी त्याचे काही मला वाटणार नव्हते. त्याप्रमाणे पट्टा बांधून मला चालता येऊ लागले. गोळ्या व इंजेक्शने यांनी प्रकृती सुधारली व मला बरे वाटू लागले एका प्रसंगातून पार पडतोय तोच दुसरा प्रसंग उभा राहिला. आमच्या दिलीपची पत्नी शेफाली ही पहिल्यांदाच गरोदर होती. मुलाबरोबर तिच्या पोटात ट्यूमर वाढला होता. त्याचे ऑपरेशन करणे जरूर होते पण त्याचवेळी जन्माला येणाऱ्या बिचाऱ्या अर्भकाला धोका निर्माण झाला होता. दिलीप शेफाली व आम्ही सारी भावंडे पुन्हा चिंतेत. एकातून सुटतोय तर दुसरे पाठीशी. मी पुन्हा बाबांची करुणा भाकू लागले. पुन्हा स्तोत्र पठण व जप सुरु झाला. मग मी शेफालीला म्हणाले, 'शेफाली, तू आता श्रीसाईबाबांना नवस कर. तुझे बाळंत-पण सुखरुप होऊ दे आणि मुलगा होऊ दे त्याचे नाव 'साईनाथ' ठेवीन असे मनापासून बोल. बाबा तुझ्या हाकेला धावून आल्याशिवाय राहाणार नाहीत.' शेफालीने हे ऐकले त्याप्रमाणे तिने नवस केलाय आणि बाबांचे नाव घेत राहिली आणि काय आश्चर्य! तिचे ऑपरेशन सुलभ रीतीने पार पडून तिला मुलगा झाला. कसलाही त्रास झाला नाही. तिने बोलल्याप्रमाणे बाळाचे 'साईनाथ'

असे नाव ठेवले. आता आमचा बाळ ठीक आहे. आम्ही सर्व बाबांच्या कृपाछत्राखाली आनंदाने राहात आहोत. ही सारी साईबाबांची कृपा.

> 'जो मजवरी विश्वासला
> त्याचा मनोदय पूर्ण केला'

हे बाबांचे बोल त्यांच्यावर मनापासून विश्वास ठेवल्यावर खरे होतात असे अनेकदा अनुभव आम्हास आलेले आहेत.

◆◆◆

# 'प्रसाद',– श्रीसाईबाबा विशेषांक

[संपादक – **श्री. मनोहर जोशी**, प्रसाद प्रकाशन, पुणे ३०. पृष्ठे १६८, किंमत ७ रु.]

पुण्याच्या प्रसाद मासिकाने दरवर्षी आपला वर्षारंभ अंक दैवत खास अंक काढण्याची योजना आखली असून त्यानुसार आतापर्यंत बारा खास अंकांचे आपले एक तप पूर्ण केले आहे. यंदाचा ऑगस्ट ७९ चा वर्षारंभ अंक हा श्रीसाईबाबा विशेषांक म्हणून प्रकाशित करण्यात आला आहे. श्रीसाईबाबांची यंदा ६१ वी पुण्यतिथी येते, यानिमित्ताने समस्त साईभक्तांना हा अंक म्हणजे साईभक्तीचा एक साहित्य-मळाच आहे यात शंका नाही.

या खास अंकात श्री. र. शा. गोसावी यांनी सर्व दृष्टीकोनातून लिहिलेली बाबांची जीवनीका असून न्या. राम केशव रानडे, डॉ. शेजवलकर, डॉ. भिंगारकर, ह. भ. प. धुंडा महाराज देगलूरकर, डॉ. गव्हाणकर, श्री. द. श्री. मराठे, श्री. सदानंद चेंदवणकर, श्री. र. शं. जुन्नरकर, श्री. व्ही. बी. खेर इ. नामवंतांचे श्रीसाईबाबांवरील विविध प्रकारचे सचित्र लेख आहेत. श्री. म. स. घोलप यांनी 'श्रीसाईबाबांची शिरडी' या लेखातून शिरडी क्षेत्राचे अगदी सार्थ दर्शन घडविले आहे. श्रीसाई मंदिरांची सूची अनेक साईभक्तांना संग्राह्य वाटणारी आहे. तसेच अंकातील साईसमकालीन व्यक्तींच्या श्री. घोलप यांनी घेतलेल्या मुलाखती वाचनीय आहेत. जोडीला खास आकर्षण म्हणजेच श्रीसाईबाबांचा सांप्रत अप्रकाशित असा फ्रेम करण्याजोगा फोटो आहे. प्रत्येक साईभक्ताने हा अंक अवश्य संग्रही ठेवावा इतका तो सुरेख आहे अशी आमची शिफारस आहे.

# साई भजनी मन रमले

श्री. सूर्यकांत माधवराव गर्जे
८० शिवाजीनगर पुणे-५

● भव्य शामीयाना उभारलेला आहे. मंचकावर श्रीबाबांची मोहक हसत मुख प्रतिमा ठेवलेली आहे. टवटवीत टपोऱ्या गुलाब-पुष्पांच्या मालीकेने श्रीबाबांचे रुप अधिकच नयन मनोहर दिसत आहे. उदबत्तीचा मंद मंद सुगंध हवेत दर-वळत आहे. सर्वंध वातावरण भाव-सुमनांनी अन् भक्ति-प्रेमाने ओथंबलेले आहे. असंख्य साई-भक्त दाटी वाटीने सभागृहात बसलेले आहेत. प्रत्येकाच्या चेहऱ्या-वर प्रसन्नतेची छटा स्पष्ट दिसत आहे. मद्रास येथील मैलापूर उपविभागातील श्रीसाईनाथ मंदिराच्या भव्य प्रांगणात श्रीसाई-भक्तांचा मेळावा भरलेला आहे. देशाच्या कोना कोपऱ्यातून मोठ्या संख्येने श्रीसाई-भक्त येथे जमा झाले आहेत. सर्वच साईमय वातावरण दिसत आहे. भासत आहे.

श्रीसाई-भजन सुरू झाले. आकाशातील चंद्राची कोर जशी प्रतिदिनी वाढत जाते तशी क्षणा क्षणाला भजनाची गोडी वाढू लागली. साई भजनी मन रमू लागले. पंच-पक्वान्नांचे भोजन जीव्हेला रूचि आणते तसे श्रीसाई भजन मनाला मोहरून जाते. भावनेला फुलारून टाकते. याचा एक आगळाच अनु-भव मला इथे आला.

आंध्र-प्रदेशातील कडप्पा गावाजवळ वसवलेले श्रीसाई-नगर व तेथील श्रीसाईनाथ मंदिराचे एक प्रवर्तक, श्रीसाईनाथ महाराजांचे एक थोर चिंतक व परम उपासक श्रीबशीरबाबा यांचे तिथे जसे अचानक आगमन झाले तसेच भजनाचा अपूर्व सोहळा पण अचानकच घडला. मीच नव्हे तर तिथे उपस्थित असलेले हजारो साई-भक्त साई-भजनात दंग झाले. देहभान विसरले. स्वतःला साई नाम-संकीर्तनात हरवून बसले. व्यवधानाची जाणीव राहिली नाही की, मध्यरात्र उलटून गेली तरी त्याची जाण राहिली नाही. डोळ्यांच्या पापण्या मिटत नव्हत्या की, ओठांची हालचाल थांबत नव्हती. एकच लय, एकच आवाज श्वासाश्वासातून साईचाच ध्यास. श्रीबशीरबाबा म्हणत होते आणि हजारो आवाज त्यांना साथ देत होते. एका मनाने, एक सूराने. भक्तीची चंद्रभागा श्रीसाईभजनाने दुथडी भरून वाहत होती. श्रीसाईनाथ महाराजांच्या

या राऊळात भजनाचा दीप भक्तीच्या तेलाने पाजळत होता. मनं उजळली जात होती. प्रकाशात न्हावून निघत होती.

आसमंतात स्वर उमटत होते—
साई राम साई राम
साई साई साई राम ।
मुझमें है साई राम
तुझमें है साई राम
सबमें है साई राम
साई राम साई राम ।
मनसे कहोरे साई राम
तनसे कहोरे साई राम
दिलसे कहोरे साई राम
साई राम साई राम ।
राम है साई राम
कृष्ण है साई राम
शंकर है साई राम
साई राम साई राम ।

भजनातील काही पंक्ती वर निर्दिष्ट केल्या आहेत. पेटी-तबला यांच्या साथीवर भजन घोळून घोळून म्हटले जात होते. संगीताच्या तालावर प्रचंड सर्प डुलावा ना तसा भजनांच्या सुरावर प्रचंड जन-समुदाय डुलत होता. साई भजनात मन रमले होते. तल्लीन झाले होते.

श्रीसाईनाथ महाराजांच्या भजनात काही अवीट गोडी आहे. एकदा आसन लावले, श्रीबाबांचे स्मरण करून भजनाला सुरूवात केली म्हणजे ब्रह्मानंदी टाळी लागलीच म्हणून समजा अशा वेळी देहाचे भान राहोच प्रंतु वेळेचेहि भान रहात नाही. हा स्वानुभव आहे. शांत जलाशयावर खडा टाकला की, पाण्यावर हलके फुलके तरंग उमटतात. आपल्या मनाची अवस्था देखील तशीच आहे. श्रीसाई भजनाने मनः पटलावर भक्तीचे तरंग उमटतात. शुद्ध चारित्र्यपूर्ण व्यक्तिमत्व घडविण्यासाठी अशा तरंगांची आवश्यकता आहे. आजच्या काळाची ती एक नितांत गरज आहे. श्रीसाई भजनाची आवड लावून घ्यावी लागत नाही, ती आपोआप लागते. यथा शक्ति यथा मती श्रीबाबांची भक्ति करू लागलो की मनाचा हळू हळू विकास होतो. जीवनात प्रकाश डोकावतो. लोहचुंबक लोखंडाला

आकर्षूण घेते तसे श्रीबाबा भक्ताला आपल्याकडे आकर्षून घेतात. खऱ्या भक्तीची कास धरायला लावतात. श्री साई भजनाने मनाला रूचलेली मनात रूजलेली साईभक्तीची वेल सरसरून फुलते. फळा-फुलांनी डवरते. जीवनाची बाग फुलवायची असेल तर श्री साई-भजनाचे सिंचन करावयास हवे.

श्री साईंचे भजन, पूजन, मनन, चिंतन आणि स्मरण ही भक्तीचीच अंगे होत. इथे हवी मनाची एकाग्रता, मनाची शुद्धता आणि ती सहज साध्य होते. त्यासाठी श्रीसाईंची आराधना अखंड केली पाहिजे. श्री साईं वरून जीव ओवाळून टाकला पाहिजे. भक्तीची ज्योत हृदय-मंदिरी सतत आणि सातत्याने तेवत ठेवली पाहिजे. असे केले असता भक्तीच्या डोंबात षड्रिपूंचे भस्मासूर जळून खाक होतील. मन शुचिर्भूत होईल. पावसाची पहिली सर येऊन गेल्यावर वातावरणातील गढूळता नष्ट होती तशी.

श्री साईंच्या भजनात माझे मन सतत रमते. श्री साईंचे भजन माझा श्वास आहे. हे भजन थांबेल तेव्हा श्वास थांबेल. जीवनच संपेल. श्री साईंच्या भजनासाठी मी कित्येक रात्री जागून काढल्या आहेत. एकच आस एकच ध्यास. साई हाच माझा श्वास. साई भजन हेच माझे भोजन त्याचसाठी माजे जीवन. ज्याला साई भजनाची गोडी लागते त्याच्या जीवनाची गाडी रात्र आणि दिवसाच्या रूळावरून सुरळीत गेलीच म्हणून समजा.

खांद्यावर साई नामाची पताका घेऊन, गळयात साई-सुमनांची माला अडकवून, कपाळावर साईनाथांची उदी लावून, हातात साई भक्तीच्या चिपळया घेऊन शिर्डीच्या वाटेवरून जाताना मी गर्जत जाईन.

साई भजनी मन रमले
नयनी अमृत भरूनी स्त्रवले
आणिक पुढती साई दिसले
मन श्री चरणी विलीन झाले
साई भजनी मन रमले.

❖ ❖ ❖

# ओळखा पाहू मी कोण ?

कु. प्रज्ञा रामचंद्र सबनीस
मेन कॉलनी, जी. ६ नं. ५ वालचंदनगर, जि. पुणे

● "साईनाथ माऊली, साईनाथ माऊली" पाहिलस ! मनाचा आनंद द्विगुणीत करणाऱ्या, न कळत का होईना पण शरीराच्या रोमारोमांना प्रफुल्लीत करणाऱ्या, क्षणभर का होईना जगाला विसरायला लावणाऱ्या, दुःखातही सुख देणाऱ्या नाचायला, हसायला आणि फुलायला लावणाऱ्या या शब्दानी माझं जीवन कसं आनंदीमय करून टाकलय ! हा अद्वितीय आनंद मला नाही वाटतं दुसऱ्या कशात मिळाला असता ! त्यामुळे प्रथम मला या शब्दांचे आणि या शब्दांना जिवंत बनविणाऱ्या त्या माऊलीला, त्या मूर्तीला, तिच्या किर्तीला आणि शब्द उच्चारावयास लावणाऱ्या या स्फूर्तीला शतशः प्रणाम करायला वेत.

आजपर्यंत चालून आलेल्या वाटेवर जर जागीच थांबून मागे पाहिलं तर थोडे फार खाचखळगे सोडले तर दिसतो एक सरळ सपाट रस्ता. कळायला लागल्या पासून कधीच असं वाटलं नव्हतं कि आपल्या आयुष्यात असं काही घडेल. कुठल्या एका मोठ्या पहाडातून, कण न् कण पवित्र असलेल्या या भूमीत कसा आलो या साईसच ठाऊक ! नशीबाचे धागे अगदी चांगले अन् पक्के होते म्हणायचे ! दुसरे काय ? नाहीतर ......... विचारच करवत नाही आज कुठे असतो ते कदाचित एखाद्या कुटुंबात, एखाद्या ऑफीसमध्ये एखाद्या शाळेत एखाद्या अलिशान हॉटेलात एखाद्या विमान तळावर, एखाद्या स्टॅंडवर नाहीतर एखाद्या बंदरावर कदाचित् पडक्या इमारतीत सुद्धा आयुष्य कंठावे लागले असते मग काय आले असते वाट्याला ? आकाशाएवढे दुःख किंवा थोडेसे सुख. तहानेने तडफडणाऱ्या पाखराला पाण्याचा एखादा थेंब मिळावा तसे. पण बराच विचार करता दिसेल कि आले असते वाट्याला दुःखच कारण तिथे कुणी माझा विचार केला असता ? कुणी माझी विचारपूस केली असती ? अहो ! बाकीच तर सोडाच कुणी साधं पाहिलही नसतं ! इतरांच्या दृष्टीने मी एक मामुली चीज बनलो असतो. केवळ यातनांचा दाहच सहन करावा लागला असता. स्वतः वेदनांच्या निखाऱ्यावर जळत इतरांच्या सुखाला साथ देणं जमलं असतं का मला ? पण छे ! अहो मग देव म्हणतात तरी कशाला ? त्याच्या शिवाय कोण पाहिल माझ्या सारख्याला ?

या साईनाथांनीच मी लहान असताना मला इथे या पवित्र भूमीत आणलं. आणि आज...आज मला माझाच हेवा वाटू लागलाय इतकं सुख दिलय त्यांनी मला. इथे काय साईच्या भूपाळीने उठावं, फूलांच्या सुगंधानं न्हावं, साईच्या ओवी भजनाचं भोजन करावं, आरतीचा विडा घ्यावा, दर्शनाला आलेल्यांना प्रति नमस्कार करीत साईच्या महिमेच्या गप्पा माराव्या. साईची महती मनात साठवित रहावं, मनात लाखोवेळा साईना प्रणाम करीत दुपार घालवावी. संध्याकाळच्या आरतीने प्रफुल्लीत व्हावं, प्रसादानी महिमा वाटावा, सर्वजण गेल्यावर स्वतःचा मनाला आनंदीत करणारा असा साई जप करावा. 'सतत तुझी आठवण राहू दे' एकढीच मागणी करून धूपदिपांच्या मंद सुवासात साईना आठवित दुसरे दिवशीच्या नव्या उत्साहाला साद घालण्यासाठी निजावं. असा हा नित्यक्रम इथे आल्यापासून अगदी उन्हाळ्यानंतर पावसाळा, पावसाळ्यानंतर हिवाळा पुन्हा उन्हाळा यापेक्षाही निश्चित स्वरुपाचा होऊन बसलाय ! यात काही बदल करावा किंवा व्हावा असं मुळीच वाटत नाही. आहे हे अगदी छान उत्तम !

मी इथे आल्यापासून अनेकांचे साईच्या विषयीचे अनुभव ऐकले. साईनी कुणाला प्राणातून वाचविले, कुणाला रोगातून मुक्त केले, निपुत्रिकांना पुत्र दिले, कुणाला संकटात मदत केली, कुणाला उज्वल यश दिले. कुणाच्या मनकामना पूर्ण केल्या तर कुणाला अलौकिक प्रेम दिले. आता मीच पहा ना ! केवढा निष्ठूर ! क्रूर ! एखाद्या गोंडस बालकाला खोक पाडीन, तर कुणाला पहाता पहाता रक्तबंबाळ करीन आजपर्यंत मी किती अपराध केले असतील ? किती गुन्हे केले असतील ? पण सागराएवढी क्षमा दया असलेल्या या माऊलीनेच मला जवळ घेतले. यांनी जर मला आश्रय दिला नसता तर मी कुठे गेलो असतो ?...

आता इथेही आम्ही पुष्कळ जण राहतो पण अजूनही आम्हाला आपआपसात भांडायची बुद्धी होते. उगाचच वितंडवाद घालीत बसतो. अशावेळी मात्र लगेच "अरे, एवढं मौलिक आयुष्य लाभलय तर त्यातला वेळ सत्कार्यात घालवा, त्यात तुमचंच कल्याण होईल. वितंडवादानं काय मिळणार आहे ? उलट एकमेकांची मन कलुषीत होतात. असे समजावून सांगणारे, पुन्हा मायेने पाठीवरून हात फिरविणारे बाबाच. त्यांच्याशिवाय आम्हाला तरी कोण आहे ? त्यांच्या या अमौलिक अशा उपदेशांच्या दोन शब्दावर आयुष्य घालवायचे. सत्कृत्य करायची, वेळ चांगल्या कामासाठी घालवायचा. खरं सांगायचं तर इथं आल्यापासून माझ्यासारखे बरेच मला भेटले त्यामुळे आता आमच्यात एक जिव्हाळ्याचं नातं निर्माण झालंय. शिवाय बाबा मग काय अड्डा खेळायचं, हसायचं, नाचायचं, रडायचं, हट्ट करायचा सारं काही त्यांच्या पुढेच.

अरे हो ! हो ! पहा आता मी बहकत जातो. असं कोणी भेटलं आणि त्यात बाबांचा विषय मग काय मी कुठे हरवतो माझं मलाच कळत नाही. पहा ' आता आरतीची वेळ झाली चला पाहू पटकन् ? पण...पण तुम्ही म्हणाल हा कोण उपटसुंभ्या ? आठवा पाहू जरा !

अहो ! मी हो ! तो...! तो...!

छे नाहीच ओळखलंत !

" अहोऽ ! मी एक साईंच्या समाधीतील दगड ! "

☆ ☆ ☆

# सद्‌गुरु सारिखा असता पाठीराखा

—श्री. सुधीर नारायण जोग
अन्नपूर्णा निवास, भास्कर कॉलनी,
कोपरी रोड, नौपाडा, ठाणे–४००६०२.

● श्री रामकृष्ण परमहंसां भोवती भक्तांनी गराडा घातला होता. एकाने विचारले महाराज परमार्थ साधनात सद्‌गुरुची आवश्यकता आहे काय ? गुरुवाचून चालायचं नाही का ? रामकृष्ण म्हणाले, न चालायला काय झालं ? गुरुवाचूनसुद्धा साधक आपलं ध्येय गाठू शकतो. इतकच की सद्‌गुरूची मदत असली म्हणजे त्याचा मार्ग सोपा होतो. असे बोलणे चालले असता समोरून गंगेतून एक गलबत चाललेले दिसले. त्या मनुष्याकडे वळून ते म्हणाले, ते गलबत चिनसुऱ्याला केव्हा पोहोचेल सांग बघू ? तो म्हणाला, मला वाटतं संध्याकाळी ५।६ च्या सुमारास पोहोचेल. रामकृष्ण म्हणाले, त्या गलबताच्या मागे ती लहान होडी दोरीने बांधून ठेवली आहे ती सुद्धा त्या गलबताबरोबर संध्याकाळी सहा वाजता चिनसुऱ्याला जाऊन पोचेल नाही ? पण समज दोरी सोडून ती होडी गलबतापासून बाजूला काढली व एकटीच वल्हवत नेली तर ती चिनसुऱ्याला केव्हा पोहोचेल ? सांग बघू ? गृहस्थ म्हणाला, ती होडी उद्या सकाळपर्यंत तरी चिनसुऱ्याला पोहोचेल की नाही हे सांगता येत नाही. श्री रामकृष्ण म्हणाले त्याचप्रमाणे साधक एकटाच ईश्वरदर्शनासाठी मार्ग क्रमु लागला तर त्याला ईश्वरदर्शन होईल पण त्याला वेळ लागेल. सुदैवाने त्याला

सद्गुरूची मदत मिळाली तर तोच त्याचा लांबचा प्रवास फारच थोड्या वेळात पूर्ण होईल ही गोष्ट वाचताच मला एका कवितेची आठवण झाली.

सुकाणुविणा नाही नौकेस थारा
पसारा शिडांचा असे व्यर्थ सारा
तसा सदगुरू वाचूनी यत्न वाया
असे दर्शवी मोरया देवराया

तसेच एकदा एका जिज्ञासू शिष्याने आपल्या गुरुला विचारले "महाराज आई व गुरू, गुरु सद्गुरु यात फरक काय ? गुरूजी म्हणाले, बाळ फार चांगला प्रश्न विचारलास. ऐक आता आई रस्त्यावरुन चालायला शिकवते पण ज्या रस्त्यावरुन चालायच तो रस्ता गुरू दाखवतो. ते पुढे म्हणाले प्रत्येकाला आई, वडील, शिक्षक हे प्रारंभिक धडे देतात. पण गुरू म्हणजे नुसताच मोठा नव्हे तर जो ज्ञानाने, ध्याने अनुभवाने, तपस्येने समृद्ध आहे तो गुरूः गुरू वाट दाखवतो पण वाटचाल ही ज्याची त्यानंच करावयाची असते. शिष्याची कुवत पाहून जो ज्ञान देतो तो गुरू. शिष्याचं बोट धरून त्याला मुक्कामाला पोहोचेपर्यंत जो त्याची साथ करतो तो गुरू. गुरुदेव रानडे म्हणत असत जो देवाचं गुप्त रूप दाखवतो तो गुरू. लौकिक जीवनात यशस्वी होण्याकरता गुरूची आवश्यकता भासते मग पारमार्थिक ज्ञान प्राप्त होण्याकरता गुरूची नितांत आवश्यकता आहे हे काय वेगळे सांगावयास हवं ? पुस्तक वाचून एकवेळ ज्ञान प्राप्त होईल पण अनुभुती मिळणार नाही. परमेश्वराच्या अस्तित्वाची अनुभुती देण्याच सामर्थ्य ज्यात आहे तो सद्गुरू. देह नव्हे मी आत्मा आहे ह्या बोधात जो अखंड समरस झाला आहे तो सद्गुरू. अशा सद्गुरूला शरण गेले असता ते जिज्ञासूला आत्मस्वरूपाचे ज्ञान करून देतात. गुरुजींची अमृतमय वाणी ऐकून शिष्य डोलू लागला. गुरूशिष्याचा हा संवाद ऐकून माझी तंद्री लागली. स्मृतीची पाने फडफडू लागली. गीतेचे पुस्तक नजरेसमोर तरळू लागले. माझी नजर एका श्लोकावर स्थिर झाली.

भीष्मद्रोण तथा जयद्रथजला गांधारनीलोपला
शल्यग्राहवती कृपेण वहनी कर्णेन वेलाकुला
अश्वत्थामविकर्ण घोरमकरा दुर्योधनावर्तिनी
सोत्तीर्णा खलु पांडवै रणनदी कैवर्तकः केशवः ॥

भीष्म व द्रोण हे ज्या रणनदीचे तीर आहेत जयद्रथ हा जिच्यातील पाण्याचा ओघ आहे. शकुनि हा जिच्यातील काळा खडक आहे. शल्य जिच्यातील मगर आहे

कृप जिच्यातील नौका आहे कर्ण जिच्यातील भारतीयी लाट आहे अश्वत्थामा व विकर्ण हे ज्या नदीतील घोर सुसरी आहेत आणि दुर्योधन हा जिच्यातील भोवरा आहे अशी दुस्तर रणनदी पांडव सहज तरुन गेले, कारण भगवान कृष्ण हा त्यांचा नावाडी होता. तुमची आमची गोष्ट सोडा रामावतारात रामाने वशिष्ठाला व कृष्णावतारात कृष्णाने सांदीपनीला गुरू केले. सद्‌गुरूचा मोठेपणा सिद्ध करण्याकरता देवसुद्धा ज्याना शिरोधार्य मानतात त्यांची महती आणखीन काय वर्णन करावी. म्हणून ज्ञानेश्वरांच्या शब्दात सर्व गुरू भक्तांना विनंति करतो.

"म्हणोनि जाणते नि गुरू भजिजे
तेणे कृतकार्य होईजे
जैसे मूळसिंचने सहजे
शाखा पल्लव संतोषति ॥

# ॥ हे शारदे वाग्विलासिनी ॥

— श्री. गणपत गो. सामंत एम्. ए.
'गुरूकुल' – मुंबई–६८.

● महाभारत, रामायण, श्रीज्ञानेश्वरी, श्रीनाथ भागवत, श्री दासबोध, श्री साईसच्चरित इत्यादि ग्रंथराज वाचल्यानंतर असे वाटते की हे केवळ चरित्रग्रंथ नसून ऐहिक व पारमार्थिक ज्ञानग्रंथ आहेत. हे ग्रंथ इतक्या सहजगत्या पद्धतीने लिहिले आहेत की वाचताना दुथडी भरून वाहणाऱ्या गंगेची आठवण येते. ओव्यांची जुळवाजुळव करण्याची शाब्दिक ओढाताण नाही तर ओव्या गंगौघाप्रमाणे सहजस्फूर्त आहेत. या ग्रंथात कृत्रिमता नाही. जे आहे ते जिवंत काव्य म्हणूनच वरील ग्रंथराज व विशेषतः श्रीसाईसच्चरित वाचताना श्रीसाईभक्त दासगणूंच्या खालील ओवीची महति पटते.

हे शारदे वाग्विलासिनी ।
तूं शब्दसृष्टीची स्वामिनी ।
तुझे अस्तित्व म्हणूनि ।
व्यवहार चालती जगताचे ॥
तूं ग्रंथकाराची देवता ।
तूं भूषण देशाचे सर्वथा ।

खरा भक्त देव, साधुसंत यांची एकमेकाशी तुलना करून अमूक देव किंवा साधु श्रेष्ठ असे मुळीच म्हणणार नाही. प्रत्येकाच्या आवडी–निवडी वेगवेगळया असतात म्हणून खरा भक्त आपला देव ठरवून व इतरांवर टीका न करिता आपल्या आराध्य देवाची मनोभावे सेवा करील. तद्वतच तो भक्त आपणास आवडणाऱ्या ग्रंथराजाची पारायणे करील ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा प्रश्न.

मी अनेक ग्रंथ वाचले व ज्याप्रमाणे श्रीसाईबाबांवर प्रेम जडले तसेच 'श्रीसाई सच्चरिता' वर सर्व भक्ति एकत्रित केली. अनुभव घेतले. त्यामुळे श्रीसाईबाबांच्या शिरडीत वावरताना प्रत्येक गोष्टीचे, वस्तूचे महत्व पटते. ती वस्तू पाहताना श्रीसाई-सच्चरितातील मजकूर समोर दिसतो. प्रत्येक प्रसंग डोळयासमोर उभा राहतो. 'श्रीसाईसच्चरित' हा प्रासादिक ग्रंथ आहे. या ग्रंथातील निर्मळ ओव्या वाचताना बाबांचे जीवन, तरुणपण, दररोजचे कार्यक्रम, चमत्कार, तत्वज्ञान यांची प्रचिती येते बाबांच्या कृपेचे फळ म्हणजेच हेमाडपंत (दाभोलकर) रचित 'श्रीसाईसच्चरित' वाङ्मय, भाषा समर्पक असून डामडौलाची आहे. प्रत्येक मराठी वाचकास अभिमान वाटेलच व आपल्या मराठीचे महत्व पटेल. अशा वेळी श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या खालील ओवीची प्रचिती येईल.

माझा मराठाचि बोलु कौतुके
परी अमृतातेही पैजा जिंके
ऐसी अक्षरे रसिके मेळवीन ।

त्याचबरोबर मराठी भाषेचे भवितव्य भव्य–दिव्य आहे हे माधव ज्यूलियन यांच्या खालील काव्यातून प्रतीत होईल—

मराठी असे आमुची मायबोली,
जरी आज ती राजभाषा नसे ।
नसो आज ऐश्वर्य या माऊलीला,
यशाची पुढें दिव्य आशा असे ।

आज मराठी भाषा मोठे मानाचे स्थान मिळवून आहे. मराठी ग्रंथकार व विशेषतः 'श्री साई सच्चरिता' सारखे ग्रंथ या यशाला कारणीभूत आहेत. म्हणूनच

जैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी
की परिमळांमाजी कस्तूरी
तैसी भाषांमाजी साजिरी
मराठिया ।।

अशी परिस्थिती आज आहे.

शिरडीस मशीदींत (द्वारकामाई) गेल्यानंतर हेमाडपंतांच्या खालील ओव्यांची आठवण आल्यावाचून राहात नाही.

हीच आपुली द्वारकामाता
मशिदीचे या अंकी बैसता ।
लेकुरां देई ती निर्भयता
चिंतेची वार्ता नुरेचि ॥
मोठी कृपाळू ही मशीदमाई
भोळया भाविकांची ही आई ।
कोणी कसाही पडो अपायी
करील ही ठायींच रक्षण ॥
एकदां हिचे जो अंकी बैसला
बेडा तयाचा पार पडला ।
साऊलीत हिचे जो पहुडला
तो आरूढला सुखासनी ॥
मशीद नव्हे ही द्वारावती
येथे जयांचे पाय लागती ।
तात्काळ क्षेम आरोग्य पावती
येईल प्रतीति तुम्हाही ॥
येथे येता आराम न पडे
हे तो कालत्रयीही न घडे ।
जो या मशिदीची पायरी चढे
तयाचे बेडे पार जाणा ॥

बाबांची वरील अमृतमय वाणी हेमाडपंतांनी ओवीबद्ध करून साईभक्तांसाठी अजरामर करून ठेविली.

हीच द्वारका द्वारावती
नांव हिचे मशीदमाई
—श्रीदास काई घालवील ।
आई ती आई बहु मायाळू
लेकरालागी अति कनवाळू ।
परी लेकरेच निघता टवाळू
कैसा सांभाळू करी ती ॥

श्रीसाईस प्रिय असलेली श्रद्धा आणि सबूरी असल्यानंतर अशक्य काहीच नाही.

इष्टानिष्ट सुखदुःख
संचितानुसार अमृत वा विख।
हे प्रवाहपतीत द्वंद्व देख
धरी न हरिख वा शोक॥
जे जे येईल ते ते साहे
अल्ला मालिक वाली आहे।
सदा तयाच्या चिंतनी राहे
काळजी वाहे तो सारी॥
होणार ते होऊ द्या यथेष्ट
सद्गुरुचिंतन आपुले अभीष्ट।
संकल्प विकल्प होतील नष्ट
संचित अनिष्ट टळेल॥

श्रीसाईसच्चरितातील वरील ओव्या व दासबोधातील खालील श्लोक तेच सांगतात.

मना त्वांचि रे पूर्व संचित केले।
तयासारिखे भोगणे प्राप्त झाले॥
मनी मानव व्यर्थ चिंता वहाते।
अकस्मात् होणार होऊनी जाते।
घडे भोगणे सर्वहि कर्मयोगे।
मतीमंद ते खेद मानी वियोगे॥

श्रीशनिमाहात्म्यातील खालील ओव्या हेच दर्शवितात–

जे जे पुढे होणार।
म्हणोनि बुद्धि सुचे तदनुसार।
तरी जें असेल लिखिताक्षर।
तैसे आता होईल॥
ऐशीं क्रमीली वर्षे दोन।
तोंवरी दुःख सोशिले अति दारुण।
ऐसे कर्माचे विंदान।
भोगिल्यावीण सुटेना॥
राव म्हणे ऐक पतिव्रते।
हा कर्मभोग जाण निरुते।
ग्रहदशा फिरली माते।
हे कर्तृत्व देवाचे॥

ग्रहदशेतून कोणी सुटत नाही. परमेश्वराने निर्माण केलेली ही ग्रहदशा प्रत्यक्ष परमेश्वराने मानवदेह धारण केल्यावर सोसली. श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण या अवतारानासुद्धा या अवस्थेतून जावे लागले. गीतरामायणातील खालील पंक्ति सर्वज्ञात आहेतच.

दैवजात दुःखे भरता दोष ना कुणाचा ।
पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा ॥

राजा विक्रमाच्या बाबतीत जे घडले तसेच राजा भद्रश्रवा याच्या बाबतीत घडले. श्रीलक्ष्मीमहात्म्यातील खालील ओवी सर्वश्रुतच आहे.

होता अवकृपा लक्ष्मीची ।
मात्रा चालेना कोणाची ॥
फळे आपल्या कर्मांची ।
भोगावीच लागती ॥

भक्तिमार्गात श्रद्धा व सबुरी मजबूत झाल्यानंतर सर्व संकटाना निर्धास्तपणे तोंड देण्याची शक्ती निर्माण होते एवढेच नव्हे तर प्रारब्धावर मात करता येते हेच श्रीसाईसच्चरितात स्पष्ट दिसते.

इतर देव सारे मायिक ।
गुरूचि शाश्वत देव एक ।
चरणी ठेविता विश्वास देख ।
'रेखेवरी मेख मारी' तो ॥
बैस आता सोडी खंत ।
खंत न करिती विचारवंत ।
झाला तुझिया भोक्तृत्वा अंत ।
पाय शिरडीत टाकिता ॥
आकंठ संकटार्णवी बुडाला ।
हो का महद्दुःखगर्तेत गढला ।
जो या मशीदमाईची पायरी चढला ।
सुखा आरूढला तो जाणा ॥
तीच कनवाळू सर्वांची आई ।
हाकेसरशी धावत येई ।
कळवळून कडिये घेई ।
जाणे सोई लेकरांचीं ॥

अशी परिस्थीती निर्माण करण्यासाठी श्रीसाई काय मागतात ?

दोन हात एक माथा ।
स्थैर्य श्रद्धा अनन्यता ।
नलगे दुजे साईनाथा ।
एक कृतज्ञता ते व्हावी ॥

एवढे अर्पण केल्यास अशक्य ते काय ?

ऐसे हे संत कृपाळ ।
प्राप्त होता उदयकाळ ।
दर्शने हरिती भवजंजाळ ।
काळहि मागे परतविती ॥
कृतांताच्या दाढेतून ।
काढीन मी निजभक्ता ओढून ।
करिता केवळ मत्कथा श्रवण ।
रोगनिरसन होईल ॥
लक्ष लावी जो मजकडे ।
नाही तयासी कैचेंहि सांकडे ।
तोचि माझा जैं विसर पडे ।
माया कोरडे उडवी तैं ॥

आता आपण कलियुगात वावरत आहोत. सर्वसामान्य माणसाची जगण्यासाठी धडपड चालू आहे. या धडपडीत व इतर धकाधुकीत इतका वेळ जातो की हे सर्व जीवन-व्यवहार थांबवून किंवा संपवून शास्त्रोक्त पद्धतीने आचार-नियम पाळून पूजा-अर्चा करून भक्तिमार्ग चालू ठेवणे अशक्यच आहे. दोलायमान जीवन, अनिश्चितता दररोज बदलणारे राजकारण यातून सुटून भक्तिमार्गाचा कसा अवलंब करावयाचा ? त्यासाठी सर्व नियम टाकून शॉर्टकट म्हणजे नजिकचा मार्ग काढणे आवश्यक.

मानवनिर्मीत ॲटमबॉंब मानवजात नष्ट करू शकेल पण मानवजात नष्ट न करता रामराज्य आणणारा ॲटमबॉंब मनुष्य उत्पादन करू शकत नाही. मानवाचे निर्बीजीकरण करण्याची साधने आणि यंत्रे आपण उपलब्ध केली पण वांझपणावर आम्ही इलाज करू शकत नाही. पावसासाठी निसर्गावरच अवलंबून राहावे लागते. याचाच अर्थ कलियुगात आपण विध्वंसक गोष्टींचे उत्पादन करू शकतो. निसर्गावर मानव सत्ता गाजवू शकत नाही म्हणूनच की काय–नरेंचि केला हीन किती नर–अशी आजची परिस्थीती. संस्थानिक गेले पण प्रत्येक पाच वर्षात अनेक पटीने नवीन

संस्थानिक निर्माण होत आहेत. सत्तालोलुप पुढाऱ्यामुळे सर्वसाधारण माणसाला जिणे अशक्य होत आहे. चांगुलपणा, सत्यवक्तेपणा, सात्विकता वगैरे गुण असणे हा अपराध ठरत आहे. कलियुगाचा महिमा—कालाय तस्मै नमः। म्हणून स्वस्थ राहिलेले बरे—

अशा या परिस्थितीत निराश न होता भक्तिमार्ग अवलंबणे श्रेयस्कर ठरेल. शास्त्रोक्त मार्गाने आपण भक्तिमार्ग पत्करू शकत नाही पण श्रीसाईभक्त दासगणूंच्या उक्तिनुसार खात्रीने भक्तिमार्ग अवलंबिता येईल:—

बहुतेक करून कल्पना ।
करितो तुमच्या पूजना ।
तेच पूजन दयाघना ।
मान्य करा या दासांचे ॥
आता प्रेमाश्रु करून ।
तुमचे प्रक्षालितो चरण ।
सद्भक्तिचे चंदन ।
उगाळूनि लावितो ॥
कफनी शब्दालंकाराची ।
घालितो ही तुम्हा साची ।
प्रेमभाव या सुमनाची ।
माळा गळयांत घालितो ॥
धूप कुत्सितपणाचा ।
तुम्हापुढे जाळितो साचा ।
जरी तो वाईट द्रव्याचा ।
परी न सुटेल घाण त्यासी ॥
दीप माया मोहाचा ।
पाजळितो मी हा साचा ।
तेणे वैराग्य प्रभेचा ।
होवो गुरूवरा लाभ मसी ॥
शुद्ध निष्ठेचे सिंहासन ।
देतो बसावया कारण ।
त्याचे करूनिया ग्रहण ।
भक्तिनैवेद्य स्वीकारा ॥

मन माझे दक्षणा ।
ती मी अर्पितो आपणां ।
जेणे नुरेल कर्तेपणा ।
कशाचाहि मजकडे ॥
आता प्रार्थनापूर्वक मात्र ।
घालितो मी दंडवत ।
ते मान्य होवो आपणांप्रत ।
पुण्यश्लोका साईनाथा ॥

याच मानसिक पद्धतीने मी साईभक्ति करीत आहे. 'श्रीसाईसच्चरिताची' याच रितीने पारायणे केली व ती सर्व फलद्रूप झाली. सर्वज्ञ परमेश्वराला कलियुगाची कल्पना असल्यामुळे श्रद्धायुक्त काल्पनिक पूजाविधीवरच तो संतुष्ट आहे. अर्थात् अशा श्रद्धेची मधून-मधून कसोटी-सत्त्वपरिक्षा व्हायचीच.

माझे एक गाढे पंडित मित्र होते. भारतातील सर्व विद्वान कीर्तनकारांचा एकदा काशीला मेळावा जमला होता व तेथे श्रीशंकराचार्यासमोर सर्वांनी कीर्तन करून हजेरी दिली. या मेळाव्यात माझ्या या कीर्तनकार मित्राचे कीर्तन झाले व त्यांना पूज्य श्री. शंकराचार्यांनी 'कीर्तनकेसरी कीर्तनालंकार' अशी पदवी बहाल करून त्यांचा बहुसन्मान केला. या माझ्या पंडित मित्राची चातुर्मास्यातील सर्व कीर्तने ऐकीली. अफाट ज्ञान, अमोघ वक्तृत्व, सुस्पष्ट वाणी व उत्कृष्ट गायन ऐकून मला वाटले की परमेश्वराने आपणास गरीबी द्यावी, मुके ठेवावे पण माझ्या या पंडित मित्रासारखे बृहस्पति करावे. खरोखरच हेवा वाटण्यासारखे ज्ञान. कीर्तनात गोष्टींची-तत्त्वज्ञानाची पुनरावृत्ति नाही. दररोज नाविन्य कायम. निरीश्वर वाद्यास निरुत्तर करून ईश्वरावर भरंवसा ठेवण्यास लावण्याचे चातुर्य व पांडित्य, या अशा पंडित मित्राने मला एकदा आश्चर्याचा धक्का दिला. एकदा आम्हा दोघांचा वाद चालू असताना तो म्हणाला की आपला परमेश्वरावर बिलकूल विश्वास नाही. तुम्ही श्रीकृष्ण, श्रीराम, श्रीसाई यांना परमेश्वर समजता तर तुम्ही त्यांना पाहिले आहे का ? त्यांनी केलेले चमत्कार तुम्ही पाहिलेत का ? स्वतःचा तोल सावरून मी त्याला विचारले की तुमचे आई-वडिल तुम्हांस ठाऊक आहेत काय ? कशावरून तेच तुमचे आई-वडिल ? तुम्ही जन्म घेताना आईचे मुख पाहिले काय ? स्वारी निरुत्तर झाली.

रूढ्यानूरूढया चालत आलेल्या ज्ञानावर, माहितीवर तुम्हास विश्वास ठेवलाच पाहिजे, आज श्रीसाईंना पाहिलेले अनेक वृद्ध आहेत. असे तीन वृद्ध मला भेटले. सर्व अधिकारी, विश्वास ठेवलाच पाहिजे. श्रीसाईचरित् ही श्रीसाईबाबांची जिवंत

जीवन गाथा, प्रत्येक शब्द मोजून-तोलून हेमांडपंतानी घातला आहे. कीर्तनकेसरीना स्वस्थ राहावे लागले.

कर्माच्या गती असती गहना ।
जे जे होणार ते कदा चुकेना ।
ते ते भोगिल्यावीण सुटेना ।
देवादिकां सर्वांसी ॥ (श्रीशनिमाहात्म्य)

हे जरी मला मान्य असले तरी श्रद्धा व सबुरी यांच्या बळावर भोग भोगण्याची भक्तास ताकद येते. कालावरहि श्रीसाईकृपा प्रसादाने मात करता येते याचे अनुभव प्रस्तुत लेखक घेत आहे.

मग जो गाई वाडेकोडे ।
माझे चरित्र माझे पवाडे ।
तयाचिया मी मागे पुढे ।
चोहींकडे उभाचि ॥
जो मजलगी अनन्य शरण ।
विश्वासयुक्त करी मद्भजन ।
माझे चिंतन माझे स्मरण ।
तयाचे उद्धरण ब्रीद माझे ॥
कृतांताच्या दाढेतून ।
काढीन मी निजभक्ता ओढून ।
करिता केवळ मत्कथा श्रवण ।
रोगनिरसन होईल ॥

सर्व साईभक्तांस नम्र विनंति की वरील बाबांच्या उद्गारांवर संपूर्ण विश्वास ठेवून आयुष्यातील संकटांना तोंड देऊन मार्गक्रमणा करावी. यश निश्चीतच. हाच माझा अनुभव.

श्रीसाईसच्चरित् प्रासादिक ग्रंथ आहे. पारायणे करावीसी वाटतात. गोडी अवीट, प्रत्येक पारायणाच्यावेळी अनुभव येतोच, विश्वास पाहिजे. संकटरूप सागरातील द्वीपकल्प म्हणजे श्रीसाईसच्चरित. मराठी वाङ्मयाचे सर्वोच्च स्थान राखणारा हा ग्रंथराज शिरोमणी भक्तास तारक ठरणारच. श्रीसाईंच्या शिरर्डीत जाण्यापूर्वी हा ग्रंथराज निपक्षपातीपणे एकदा वाचावा. श्रीसाईंच्या जीवनावर आधारित नाटक, सिनेमा निघाल्यामुळे आज सर्व रस्ते शिरडीप्रतच जात आहेत व शिरडी भारतातील नव्हे तर जगातील सर्वश्रेष्ठ क्षेत्र मानले जाणार यात शंकाच नाही.

---

# मंत्रालय निवासी श्रीगुरु राघवेंद्र

**सौ. शशिकला रेवणकर**
बालाजी नगर, अंबरनाथ, ठाणा

● आपली भारतभूमि ही खरोखरच पुण्यभूमि आहे. संतांचे माहेरघर आहे. पृथ्वीच्या उत्पतीपासून आजपर्यंत कितीतरी थोर संत–महात्मे होऊन गेले. त्यातील जास्त भारतातच, शिवाय प्रत्यक्ष भगवान विष्णूने जगाच्या रक्षणासाठी आजपर्यंत अनेक अवतार धारण करून पृथ्वीवर वास्तव्य केले, ते सुद्धा भारतातच म्हणूनच आपण भारतवासी कितीतरी भाग्यवान आहोत. भारतभूमी ही जगातील जवळ जवळ सर्व पामरांची आवडती भूमी आहे.

"जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती"

ह्या भगवंताच्या वचनानुसार प्रत्यक्ष भगवान १६ व्या शतकात "श्रीराघवेंद्र गुरु" या अवतारांनी पृथ्वीवर प्रगट झाले, अन् दुर्जनांच्या दाढेतून सज्जनांना बाहेर काढते झाले.

दक्षिण भारतातील सोलापूर– मद्रास या रेल्वेमार्गावर रायचूर पासून पुढे मंत्रालय हे एक स्टेशन आहे. स्टेशनपासून ५ कि. मी. अंतरावर तुंगभद्रेच्या काठावर एका थोर पुरुषाचे जिवंत वृन्दावन ( समाधी ) आहे. इ. स. १६७१ मध्ये त्यांनी वृन्दावन प्रवेश केला, पण आम्हा भक्तांच्या हृदयात व मंत्रालयात ते अजून जिवंत रूपे संचार करत आहेत, बोलत आहेत. अदृश्य रूपे सर्वकाही दैनंदिन व्यवहार करत आहेत. जो भक्त अनन्य भावे त्यांची सेवा करून त्यांना शरण जातो, त्यांच्या मागे-पुढे चोहीकडे ते उभे आहेत. त्यांच्याशी बोलून सर्व काही सुचना त्यांना देत आहेत. याची खरोखरच भाविक जिज्ञासूंनी प्रचिती पहावी.

श्रीगुरु राघवेंद्रांचा जन्म इ. स. १६०१ साली ब्राम्हण कुटुंबात कर्नाटकातील कुंभकोण येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नाव तिम्मन भट्ट व आईचे गोप्पंम्मा व पत्निचे सरस्वती. त्यांच्या वाडवडीलांपासून सर्वजण वेदविद्यापारंगत व वीणावादक होते. त्यांचे वडील व आजोबा यांना कृष्णदेवरायांच्या दरबारात मोठा मान होता पण विजय नगरच्या त्रासानंतर त्यांच्यापुढे दारिद्र्याचा डोंगर उभा राहीला. ते अन्नाला महाग झाले. त्यानंतर तिरुपतिच्या श्रीव्यंकटेशच्या कृपेने श्रीराघवेंद्राचा जन्म झाला. त्यांचे बालपण व तरुणपणाचे काही काळ तशातच गेले व त्यांचे लग्नही झाले. पण थोड्याच दिवसात श्रीराघवेंद्रानी गृहस्थाश्रमाला कंटाळून संन्यास

घेतला, व पूर्वीच्या मंचाले म्हणजेच आत्ताचे मंत्रालय या गावी दैवी तपश्चर्या करत करत मठ स्थापन केला. ते प्रभु रामाचे गाढे उपासक होते. त्यांना मारूतीचा अवतारही म्हणतात. त्यांनी भक्तांना सत्मार्ग दाखवून परमार्थ शिकवला. परमेश्वरी भक्तीचा साक्षात्कार दाखविला. परमात्मा श्रीकृष्णाने दर्शन दिले. त्यांनी संन्यास घेतल्यानंतर त्यांच्या पत्नीने विरह दुःखाने आत्महत्या केली. पण ते मात्र अजीबात आपल्या मार्गापासून परावृत्त झाले नाहीत. पूर्वीप्रमाणेच मानवोद्धाराचे कार्य करत राहिले. त्यांचा जन्म झाला तेव्हाच तिरूपतीच्या व्यंकटेशाने दृष्टांत दिला होता की "हा महाज्ञानी, सकल विद्याप्रविण असा आजन्म वैष्णव होवून, पृथ्वीवर चंद्र-सूर्य असे पर्यंत त्याची किर्ती पसरून सर्व मानवांचा उद्धार करून जगास मोक्षाचा मार्ग दाखवून उद्धरील त्याप्रमाणे ते सर्वांना उद्धरत उपदेशामृत पाजत, गावोगावी तिर्थयात्रा करत होते. प्रवासात कोठेही त्यांनी रामाची पूजा सोडली नाही. जेथे जातो तेथे, तू माझा सांगाती याप्रमाणे रामाची मूर्ती त्यांच्या बरोबरच असायची नित्य वेळेवर त्यांची पूजाअर्चा करूनच ते पुढील भोजनादी कार्यक्रम पाहायचे. मार्गात त्यांनी जातधर्म न पाहता कित्येकांना संकट मुक्त केले. कित्येक मुस्लिम राजांनी त्यांची निर्भत्सना करून परीक्षा पाहिली. पण राघवेंद्रानी दिव्यशक्तिने त्यांना योग्य ते चमत्कार दाखवून हिंदु संस्कृतीचे महत्व पटवून दिले. परमेश्वरी लीला दाखवली. त्यामुळे कित्येक मुसलमान राजे सुद्धा त्यांना मानत होते. एका इंग्रज अधिकाऱ्याने त्यांच्या वृंदावन वास्तव्या बद्दल थोडा अनादर व्यक्त केला. तर त्यांनी सर्वासमक्ष त्याला वृंदावनातून दर्शन दिले, व त्याच्याशी काहीतरी बोलले, ते पाहून तो आश्चर्य चकित होऊन विनम्र झाला, व त्यांची सेवाभक्ती करू लागला. एका मुसलमान सरदाराचा सर्प दंशाने मेलेला मुलगा २ दिवसानंतर कबरीतून काढून जिवंत केला. ते तर राघवेंद्राचे परम भक्त बनले. एका मुसलमान सरदाराने राघवेंद्राची ब्राम्हण फकिर म्हणून कुचेष्टा केली, व मुद्दाम गोमांस भरलेली ताटे नजराणा म्हणून दिली. पण श्रीगुरूंनी त्यावर अमृत दृष्टिने पाहुन त्यांची फळे फुले इ. पवित्र वस्तू करून त्यांचा वीकार केला. कित्येकांना संतती-संपत्ती देवून सुखी केले. कित्येक अज्ञान-अशिक्षीतांना महाज्ञानी व तत्वज्ञानी बनविले. त्यांचा महीमा लिहावा तेवढा कमीच आहे. तो सर्व लिहीत बसला तर हे लिखाण विस्तृत होईल. प्रत्यक्ष भगवान विष्णूच ते, त्यांचा महीमा आपण सामान्य जन कथन करू, तेवढा थोडाच आहे. त्यांच्या अगम्य लीलांचे वर्णन गाऊ तेवढे थोडेच आहे. तरी फुल नव्हे फुलाची पाकळी ह्या कृतीने मी थोडेफार वर्णन केले आहे. मी तर त्यांच्या पायाखालील मुंगी आहे. मी काय लिहू शकणार त्यांना उपमा देण्यास मजकडे शब्दच नाहीत.

"भेट द्या मला साईनाथा, राघवा, कृष्णा, श्रीदत्ता," हे आपले साईभक्तांचे आवडते पद. त्यात सुद्धा राघवेंद्राचे नाव आहेच. जसे आपल्या साई भक्तांना "साईबाबा" समाधीतून साद घालतात, रक्षण करतात. तसेच हे मंत्रालय निवासी "श्री राघवेंद्र गुरु" वृंदावनातून आपल्या भक्तांच्या हाकेसरशी धावत येतात. त्यांना संकटमुक्त करतात. त्यांच्या नवसाला पावून मनेच्छा सिद्धीला नेतात. त्यांना दृश्य–अदृश्य रूपे प्रत्यक्ष दर्शन देत आहेत. त्यांच्यातच वावरत आहेत. महाराष्ट्रातील शिरडी निवासी साईबाबा तसेच कर्नाटकातील मंत्रालय निवासी राघवेंद्र हे सर्व भक्त-जनांच्या हृदयात अत्युच्च स्थान पटकावून आहेत.

तुंगभद्रेच्या काठावर वसलेल्या मंत्रालय ह्या छोट्याशा गावाचा महीमा फार पूर्वीपासून अपरंपार आहे. कृतयुगातील हिरण्यकश्यपू राजाचा मुलगा भक्त प्रल्हाद हे राघवेंद्राचेच अवतार होत. त्यावेळी ह्याच तुंगभद्रे काठी मंचाळे गावी प्रल्हादांनी राज्य केले, व यज्ञयागादी महान कार्येही येथेच केली. आपली कुळदेवता लक्ष्मीमाता हिची सेवाही येथेच केली. तीच तेथे आता मंच्याले अम्मा या नावाने प्रसिद्ध आहे. श्री राघवेंद्रानी ह्या अवतारात सुद्धा तिचीच सेवाभक्ति करून मंत्रालय या गावी पुन्हा एकदा पवित्रता आणली व आजन्म तेथेच वास्तव्य करून त्या भूमीला मान-वांचे पवित्र मंदिर व मुक्तिधाम बनविले.

श्री राघवेंद्र गुरुनी इ. स. १६७१ मध्ये श्रावण वद्य द्वितीयेला गुरूवारी जिवंत वृन्दावन प्रवेश केला. त्यानंतर भक्तजनांनी तयार केलेले वृन्दावन कळस ठेवून व त्यावर ७०० शाळीग्राम ठेवून बंद केले व त्यावर मूळ रामदेवाची प्रतिष्ठापना केली. परवाच्या १९७१ च्या श्रावण वद्य द्वितीयेला ३०० वर्षे पूर्ण झाली. तरी वृन्दावनात ते अमर आहेत. चंद्र–सूर्य असेपर्यंत सकळ मानव जातीचे रक्षण करत पृथ्वीवर अदृश्यरूपे जिवंत राहून भक्तांचे कल्याण करणार हे प्रत्यक्ष भगवान विष्णू-नेच सांगितले आहे. अशा या महान विभूतीला मी माझे सर्वस्व अर्पण करून नतमस्तक होत आहे. अशा या थोर संत–महंताचा जयजयकार करून मी माझे इष्ट-दैवत श्री गुरूसाईनाथ चरणी लीन होत आहे.

"साईनाथ गुरू माझे आई, मजला ठाव द्यावा पाई"

"पूज्याय राघवेंद्राय नमता कामधेनुवे."

ॐ श्री राघवेंद्राय नमः सकल साधु संताय नमः

★ ★ ★

# एक लक्ष पंचवीस हजार लाडू आणि तितकेच मोदक !!!

इंदूर पासून पाच किलोमीटर अंतरावर खजाराना म्हणून एक गाव आहे. तेथील गावकऱ्यांनी दि. ३ एप्रिल १९७९ ला गणपतीची महापूजा केली व त्याला एक लक्ष पंचवीस हजार लाडू व तितकेच मोदक ह्यांचा नैवेद्य दाखविला ! ह्या गणपतीच्या देवळाचा इतिहास असा सांगतात की देवी अहिल्याबाई होळकर ह्यांच्या काळी खजारानामध्ये एक विहीर खणली जात असता गणपतीच्या तीन मूर्ती सापडल्या. त्यापैकी एक मोठी होती व दोन लहान होत्या. कपिल आश्रम ह्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या परिसरात एका देवळामध्ये ह्या तीनही मूर्तींची स्थापना करण्यात आली होती. मोठी मूर्ती मध्य भागी होती व इतर दोन मूर्ती बाजूला होत्या. ह्या देवळाच्या आसपास इतरही अनेक देवळे आहेत.

सन १८८५ मध्ये ह्या देवळाच्या काही भिंती कोसळल्या व त्यामुळे श्री गणपतीची मोठी मूर्ती फक्त शिल्लक राहिली व बाजूच्या दोनही लहान मूर्ती फुटल्या. देवळाचे बांधकाम पुन्हा करण्यात आले व फक्त मधली मोठी मूर्तीच तेवढी शिल्लक राहिली. अलीकडे तेथील भक्तांनी असे ठरविले की पूर्वीच्या लहान गणेश मूर्तींच्या जागी आता ऋद्धि व सिद्धि ह्यांच्या मूर्ती बसवाव्या. जयपूरच्या एका मूर्तीकाराला ह्या मूर्ती बनविण्यास सांगितले होते आणि त्याप्रमाणे त्याने घडविलेल्या सुंदर संगमरवरी मूर्ती ह्याच आठवड्यात आल्या. त्यांची स्थापना होणार आहे त्या निमित्ताने हा सोहळा घडवून आणण्यात आला.

खजाराना येथील प्रस्तुतचे गणेश हे दैवत जागृत असून त्याचे प्रत्यंतर भक्तांना वारंवार येत असते. दर संकष्टी चतुर्थीस येथे मोठी यात्रा भरत असते व पुष्कळ भक्तगण येथे दर्शनास येत असतात. दिनांक ३ एप्रिलला सव्वा लाख मोदक व सव्वा लाख लाडू ह्यांचा नैवेद्य गणपतीला अर्पण करण्याचा जो समारंभ झाला त्यासाठी एक मैल लांब मिरवणूक काढण्यात आली होती, व ती इंदूर शहरातील बहुतेक रस्त्यावरून मिरवत गेली. ह्या मिरवणुकीत २ हत्ती, ११ घोडे, ११ ट्रॅक्टर व असंख्य मोटारी होत्या. हत्ती, घोडे व इतर सर्वांना फुलांनी सुशोभित करण्यात आले होते. मिरवणुकीतील लोकांनी हातामध्ये निशाणे घेतलेली होती. एवढी मोठी व सजलेली मिरवणूक हा इंदूरमध्येही एक कुतूहलाचाच विषय झाला होता.

दिवसे दिवस समाजामध्ये धर्मावर व देवावर विश्वास कमी कमी होऊ लागला आहे असे आपण ऐकतो; पण प्रस्तुत समारंभासारखे प्रसंग पाहिले व लोकांचा उत्साह पहिला म्हणजे लोकांची श्रद्धा नष्ट झाली नसून वाढतच आहे असे वाटते. खजारानाच्या परिसरातील भक्तजनामध्ये मुख्यतः शेतकरी वर्गाचा विशेष भरणा आहे. त्यांनी आपण होऊन वर्गणी काढली व एक आठवड्याचा कार्यक्रम घडवून आणला. तसेच एवढे मोठे लाडू व मोदक श्रीगणपतीस अर्पण केले.

गणपतीला नैवेद्याच्या रूपाने अर्पण केलेले लाडू व मोदक प्रसाद म्हणून आलेल्या सर्व भक्तांस वाटण्यात आले. मनात आलेल्या सर्व इच्छा पूर्ण करण्याचे त्याचप्रमाणे स्त्रियांनी इच्छा केल्याप्रमाणे त्यांना संततीसुद्धा प्राप्त करुन देण्याचे सामर्थ्य ह्या दैवतामध्ये आहे अशी भाविक भक्तांची समजूत असल्यामुळे हा अपूर्व सोहळा मोठ्या थाटात पार पडला. ज्यांनी तो पाहिला ते खरोखरच धन्य होत, कारण इतके लाडू व मोदक एका ठिकाणी क्धीच पहावयास मिळणे शक्य नाही !

मूळ इंग्रजी लेख :–श्री. वामन एच्. पंडित
खारीपुरा रोड, इंदूर
मराठी अनुवाद :–डॉ. श्री. दि. परचुरे

★ ★ ★

## श्री. गोविंदराव रासने साईचरणी विलीन

पुण्याचे वयोवृद्ध साईभक्त श्री. दत्तात्रय दामोदर रासने यांचे तृतीय बंधू श्री. गोविंद दामोदर रासने यांचे २२ जुलै ७९ रोजी दुपारी तीन वाजता निधन झाले. या दिवशी श्री सावतामाळी पुण्यतिथी होती. श्री. गोविंदराव रासने हे श्री ज्ञानेश्वर महाराज, श्री पांडुरंग व श्री साईबाबा यांचे निस्सीम उपासक भक्त होते. त्यांच्याबद्दलचा उल्लेख श्रीसाई सच्चरित् अध्याय २५ मध्ये आहे. श्रीसाई मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो.

## साई दीनांचा कैवारी

साई दीनांचा कैवारी।
बाबा भक्तांचा कैवारी॥ धृ० ॥

नमुनी मस्तक तया चरणी।
नित्य राहू या नामस्मरणी।
साईप्रेरणे वाहू आपण
सुखदुःखाचा भार ॥ १ ॥ साई...

मशिद नव्हे ती, द्वारावती ती।
साईची ती तिथेच वस्ती।
तिथेच वसती तिथेच उठती।
भक्तांचा कैवारी ॥ २ ॥ साई...

भाळी लाविती टिळे उदीचे।
अल्ला मालिक नाम सदाचे।
उदी लाविता दुःख सरे ते
ऐसा देव भक्तांचा भुकेला ॥ ३ ॥ साई...

—श्री. साईदास मराठे, शिरडी.

* * *

## श्री साईराम भजन

साईराम साईराम साईराम । पतीत पावन सीताराम ॥ धृ० ॥
मंगलमय हे साईनाम । भक्तांचे हो पुरवी काम ॥
कलियुगाचा तो श्रीराम । म्हणोनी भजावा साईराम ॥१॥
शिरडी ज्यांचे समाधिस्थान । भक्तांचे हो समाधान ।
हृदयी ठेवा साईराम । भजन कराहो साईराम ॥२॥
भाऊ म्हणे जपा हो नाम । मंत्र जपावा साईराम ।
ज्याच्या वदनी साईराम । संकटी तारील साईराम ॥३॥
साईराम साईराम साईराम । पतीत पावन सीताराम ॥

—श्री. अण्णासाहेब लोंबर
श्रीसदगुरू साईनाथ कृपामठ
स्वारगेट, पुणे ९.

# साईनाथ, साईनाथ . . .

साईनाथ साईनाथ श्री साईनाथ
शिरडीचे बाबा तुम्ही साईनाथ
पतीत पावन दिनांचे नाथ
शिरडीचे बाबा साईनाथ ......धृ ॥
प्रथम येऊनी शिरडीला
निंबवृक्षा तळी लोका
जमीन खोदूनी सर्वांना
गुरु स्थान तुम्ही दावलेत ना
चमत्कार तुम्ही दावलांत ना
साईनाथ साईनाथ श्री साईनाथ ......१ ॥
शिरडीच्या वाण्यांनी ठरवूनी
तैल न देण्याचा कट केला
पाणी ओतूनी पणत्यांत
दिवे तुम्ही लावलेत ना
चमत्कार तुम्ही केलात ना
साईनाथ साईनाथ श्री साईनाथ ......२ ॥
मशिद करूनी निवास स्थान
धूनी त्या मध्ये पेटवूनी
उदी ठेवूनी सर्वांना (भक्तांना)
रोग पीडा त्यांच्या घालविल्यात ना
चमत्कार तुम्ही दावलात ना
साईनाथ साईनाथ श्री साईनाथ ......३ ॥
भक्त येतील शिरडीला
दुःखे सांगतील तुम्हाला
पूजा अर्चा करूनी तुमची
आशिर्वाद तुमचे असू द्या
कृपा दृष्टी तुमची असू द्या
साईनाथ साईनाथ श्री साईनाथ...... ४ ॥

—श्री. चंद्रकांत गणेश जोगल,
श्रीसाईधाम ३६५ सी. व्ही. पी. रोड, साईधामवाडी, मुंबई—४०००४

# आरती साईबाबांची

चाल :—( आरती अवधूता )

आरती साईनाथा । जय जय आरती साईनाथा धृ० ॥
शिरडी नगरी समाधी घेऊनी
दर्शन दे संता ॥ १ ॥
भेदभाव हा नसे मंदिरी
दाविली तू जगतां ॥ २ ॥
दिवे दिवाळीत जलात जळती ।
ऐसी लीला दाविता ॥ ३ ॥
निंबवृक्षा खाली बैसुनी ।
दाविसी खुण भक्ता ॥ ४ ॥
दुःखे हि हरती उदी लावुनी ।
साऱ्या सरती व्यथा ॥ ५ ॥
सद्‌गुरू माझे तुम्हीच असुनी ।
ठेवितो चरणी माथा ॥ ६ ॥

—श्री. भालचंद्र बा. ठसाळ.
१३, पठाण चाळ, भवानीशंकर रोड,
दादर, मुं. नं. २८.

☆

**श्रीसाईलीला – ऑक्टोबर ७९**

**श्रीसाईबाबा ६१ वी पुण्यतिथी खास अंक**

* अनेक नामवंत साईभक्तांचे लेख * अनेक प्रसिद्ध कवींच्या साईविषयक भावमधुर कविता यांनी भरगच्च

**१ ऑक्टोबर ७९ रोजी प्रकाशित होणार**

# प्रार्थना

साईबाबा, ऐकीयली मी,
तुझीच हो किर्ती,
आज मी संकटकाळी,
करते तव आरती ।
दे तूं आम्हां, शक्ती, बुद्धी,
मानसिक शांती,
कारण अति विरहाने,
सरते मम शक्ती ।
स्फुरण द्यावे प्रेरित होऊन,
सकला दयाधना,
याच कारणे विनम्र होऊनी,
करते तव प्रार्थना ।

—डॉ. मालती रहाटे
गंगाबाई दवाखाना, सिव्हिल लाईन्स
मु. पो. गोंदिया. जि. भंडारा.

# ॥ श्री साईबाबा प्रसन्न ॥

शिर्डीचा राजा सिंहासनी बसला
मोर मुकुट पितांबर धारी
करी मुरली धरिली
वाटे मजला श्रीकृष्ण अवतरला
हाक मारिता धावत धावत येई
संकटी उडी घाली
भक्त रक्षणा तनु झिजवीली
नागराज होऊनी भक्त दर्शन देई
अमृत वचनी बोल बोलुनि
भक्ती मार्ग दाविला
नमीते माथा साईनाथा
भक्त रक्षीसी गुरुनाथा

—सौ. कमल बाळकृष्ण जोशी
देशमुख बंगला, स्टेशन रोड, दुर्ग

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीवृत्त जून-७९

जून महिन्यामध्ये बाहेर गावाहून येणाऱ्या साईभक्तांची गर्दी पहिल्या पंधरावड्यात जास्त प्रमाणात होती. त्यानंतर गर्दीचे प्रमाण कमी झाले. काही कलाकारानी श्रीपुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :—

**कीर्तन :—** १) श्री. ग. वि. जोशीशास्त्री संस्थान गवई यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली.

२) सौ. कलावती व. चव्हाण दादर मुंबई याचे कीर्तन.

**प्रवचन** १) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाकचौरे शिरडी यांचे प्रवचन.

२) ह. भ. प. नारायराव का. कुलकर्णी पंढरपूर यांचे प्रवचन.

**भजन, गायन, वादन :-** १) श्री. हिरालाल बेला. खडकपूर, बंगाल. २) श्री. दामोदर ब. हिरवे पुणे. ३) श्रीमती अंजन्मा. हैद्राबाद. ४) श्रीमती निर्मला रा. नायडू शिरडी. ५) भगवतीसाई संस्थान कुर्ला, मुंबई. ६) श्री. प्रेमराज पूरनलाल. हैद्राबाद ७) श्री. जी. प्रेमराज सिकंदराबाद. ८. श्रीमती वेदावती हैद्राबाद. ९) सौ सीता लक्ष्मी, पुणे. १०) सौ सुनयता अगरवाल माहीम, मुंबई. ११) श्री. प्रसादीलाल अगरवाल, मुंबई. १२) श्री. रमेशकुमार जुले. बिकानेर १३) श्री. प्रभूदत्त वाजपेयी, प्रयाग. १४) सौ राजन सोंदा, आंध्रप्रदेश. १५) सुभाराव सामीत्री, बंगलोर. १६) श्री. भूपालन बोगम, मुंबई. १७) कु. सुनिल पी. देशपांडे, शिरडी. १८) स्वामी संजयानंद, बद्रिनाथ १९) सौ मीराबाई संजयानंद, बद्रिनाथ. २०) सौ कौसाबाई च. चोपडा, शिरडी. २१) श्री. सीताराम बा. पवार, पुणे. २२) कु. विजया राधाकृष्ण, मद्रास. २३) कु. ललिता राधाकृष्ण मद्रास. २४) कु. ख्याती देवी, मद्रास. २५) सौ मंगला सु. आपटे, बेळगाव. २६) सौ प्रमिला ना. पुराणिक, हैद्राबाद. २७) श्री. शैलेश भागवत, ठाणे. २८) श्री. बाळकृष्ण मिस्त्री, कोल्हापूर. २९) ३०) श्री, शिवाजी तु. धुमाल, शिरडी. ३१) श्री. लखनबाबू बरखेडे, नागपूर. ३२) श्रीपाद शं. साठे, पुणे. ३३) श्री. माधवराव पोतनीस, पुणे. ३४) श्री. प्रभाकर द. पारखी, पुणे. ३५) श्री. वीरेंदसिंह जहेरवाल, वर्धा.

**माननीयांच्या भेटी—**

१) मा. श्री. के. बी. जितकर. जिल्हाधिकारी अहमदनगर.

२) मा. श्री. के. कन्नन. असि. जनरल मॅनेजर बडोदा बँक, महाराष्ट्र मुंबई.

३) मा. श्री. टी. आर. देसाई. रिटायर्ड जज्ज सिटीसिव्हील कोर्ट मुंबई.

४) मा. डॉ. बहल. IARI न्यु दिल्ली.

५) मा. श्री. वर्मा. कलेक्टर सेंट्रल एक्साईज मुंबई.
६) मा. श्री. डाहाल सिव्हील जज्ज ठाणे.
७) मा. श्री. भारदे माजी अध्यक्ष ग्रामोद्योग महाराष्ट्र.
८) मा. श्री. डी. डी. रणदिवे. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण पुणे.
९) मा. श्री. पाद्ये जिल्हा सत्र न्यायाधिश उस्मानाबाद.
१०) मा. श्री. वाजेकर अध्यक्ष जिल्हापरिषद कुलाबा.
११) मा. श्री. अशोक बसाक IAS जिल्हाधिकारी नासिक.
१२) मा. श्री. जे. सी. कोहली, अंडर सेक्रेटरी मिनीस्ट्री ऑफ डिफेन्स दिल्ली.
१३) मा. श्री. दौलतराम चौहाण उद्योग मंत्री हिमाचल प्रदेश.
१४) मा. श्री. बी. पी. दलाल ICS माजी लॉ सेक्रेटरी महाराष्ट्र मुंबई.
१५) मा. श्री. बी. एन. आडारकर चेअरमन स्टेट ट्रान्स्पोर्ट महाराष्ट्र.
२६) मा. श्री. डिक्रत ब्रिगेडीअर सर्दन कमांड.
१७) मा. श्री. चौधरी डी. आय. जी. आर्मफोर्स पुणे.
१८) मा. श्री. सामंत सेटलमेंट कमिशनर महाराष्ट्र.
१९) मा. श्री. भणगे प्रांत ऑफिसर संगमनेर.
२०) मा. श्री. संत दयाराम बापू अमेली.
२१) मा. श्री. शिवाजीराव भोसले प्रिंसीपाल मुधोजी कॉलेज फलटण.
२२) मा. श्री. वैकुंठलाल मेहता सरकारी प्रशिक्षण केंद्र पुणे येथे ट्रेनिंगसाठी भारतातून आलेले ऑफिसर्स सन्मानिय पाहुणे. २० लोक.
२३) मा. श्री. दुर्गादास राठोड चेअरमन खादी ॲण्ड व्हीलेज इंडस्ट्रीज हिमाचल प्र.
२४) मा. श्री. डी. व्ही. मेहता डिव्हीजीनल इंजिनिअर फोन. इन्दौर.
२५) मा. श्री. भूचंद्र. डायरेक्टर मिनीस्ट्रीज ऑफ रेलवे न्यु दिल्ली.
२६) मा. श्री. आर. एन. वैद्य. एक्साईझ कमिशन ग्वाल्हेर.
२७) मा. श्री. एन. के. फडणविस. डायरेक्टर ऑफ टूरिझम मुंबई.
२८) मा. श्री. राव. डायरेक्टर, टेक्सटाईल्स न्यु दिल्ली.
२९) मा. श्री. टूमकर. जॉईंट डायरेक्टर इंडस्ट्रीज मुंबई.
३०) मा. अर्जन एन. मिरपुरी न्युयॉर्क अमेरिका.
३१) मा. इंद्रा अर्जन मिरपुरी —,,—
३२) मा. कुमार भागचंदानी. —,,—
३३) मा. रोमा कुमार भागचंदानी—,,—
३४) मा. शांता दर्यामिनी —,,—

हवापाणी :—शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. जून महिन्यात पावसास सुरुवात झाली नाही.

# साईनिकेतन येथील गुरूपौर्णिमा उत्सव

—डॉ. श्री. दि. परचुरे.

सोमवार दिनांक ९–७–७९ ला दादर येथील साईनिकेतनमध्ये प्रतिवर्षाप्रमाणे गुरूपौर्णिमेचा उत्सव साजरा करण्यात आला.

सकाळी ८ वाजल्यापासूनच भक्तगण दर्शनास येऊ लागले होते; व दर्शन घेऊन जात होते. गुरूपौर्णिमा हा सुटीचा दिवस नसल्यामुळे नोकरीवर जाणारे भक्त सकाळीच दर्शन घेऊन गेले; पण मुंबईच्या बहुतेक भक्तांना हे माहीत आहे की शिर्डीला साजरे होणाऱ्या तीनही उत्सवांच्या दिवशी मुंबईला साईनिकेतनमध्येही शिर्डीप्रमाणेच दुपारी बरोबर बारा वाजता आरती होते. म्हणून ज्या भक्तांना शक्य होते ते भक्त साधारणपणे अकराच्यापुढे साईनिकेतनमध्ये दर्शनाला येतात व बाराची आरती करून मग परत जातात.

साईभक्तांचा हा वार्षिक परिपाठ लक्षात घेऊनच साईनिकेतनमध्ये तीनही उत्सवांच्या दिवशी कीर्तन, भावगीत गायन, भक्तिगीत गायन, भजन अशाप्रकारचे काहीतरी कार्यक्रम सकाळी अकरा ते बारा वाजेपर्यंत केले जातात. ह्या वर्षी वरील कोणतेच कार्यक्रम आयोजित करणे शक्य न झाल्यामुळे साईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक डॉ. श्रीराम दिनकर परचुरे ह्यांनाच प्रवचनासाठी पाचारण करण्यात आले होते. सद्‌गुरूचा महिमा व गुरूपौर्णिमेचे महत्त्व ह्या विषयावर त्यांनी सुमारे पाऊण तास प्रवचन केले.

साईसच्चरिताच्या सहाव्या अध्यायातील पुढील ओवी त्यांनी प्रथम वाचून दाखविली.

"असो परमार्थु वा संसारू । जेथे सद्‌गुरू कर्णधारू
तेचि तारू पैलपारू । नेऊनि उतारू लावील ॥ १ ॥"

प्रस्तुत ओवी वाचून दाखविल्यावर केलेल्या निरूपणात ते म्हणाले, "आपण सर्व साईभक्त आहात आणि साईसच्चरित नेहमी वाचीत असाल. त्यामुळे मी त्यातल्याच एका ओवीवर आजच्या प्रसंगी निरूपण करणार आहे. साईसच्चरिताचे लेखक हेमाडपंत किंवा गोविंदराव दाभोळकर हे साईबाबांचे एकनिष्ठ भक्त होते. ते गुरुभक्तीच्या परंपरेत वाढलेले होते. त्यांना गुरूविषयी फार आदर होता, त्यामुळे

साईसच्चरिताच्या बहुतेक अध्यायातून कोठेतरी कमीजास्त प्रमाणात गुरुस्तुति आलेली आपणास दिसते. त्यातून गुरूस्तुती करणारी प्रस्तुत ओवी निवडण्याचे कारण म्हणजे तीमध्ये सद्गुरूचे यथार्थ वर्णन अगदी थोडक्यात केले आहे."

गुरू कोणाला म्हणावे ह्याचे विवेचन प्रथम करताना ते म्हणाले, "जो आपणास काहीतरी शिकवितो किंवा ज्या पासून आपण काहीतरी शिकतो तो आपला गुरू होय. त्याला आपण गुरुस्थानी मानतो. श्रीदत्ताने चौवीस गुरु केले होते, असा जो उल्लेख येतो तो याच संदर्भात आहे. श्रीदत्तगुरूंनी ह्या सर्वांच्या ठिकाणी कोणता ना कोणता घेण्यासारखा गुण पाहिला व तो ग्रहण केला आणि म्हणून ते त्यांना गुरुस्थानी झाले. तेव्हा ह्याप्रमाणे आपणही कोणापासून काहीतरी शिकून त्याला गुरु मानले तर त्यात काही बिघडत नाही; पण म्हणून तो गुरु सद्गुरु झाला काय ? सद्गुरूची लक्षणे काय ? ती हेमाडपंतांनी प्रस्तुत ओळीत थोडक्यात दिली आहेत. इतर गुरुंपासून जी विद्या आपण ग्रहण करतो ती मुख्यत: संसारोपयोगी असते. त्या गुरूंचा उपयोग आपणाला परमार्थाची वाट दाखविण्यासाठी बहुधा होत नाही. त्याकरिता मग आपणास अन्य गुरूला शरण जावे लागते; पण सद्गुरू ही दोन्ही कामे करतो. संसार असो की परमार्थ असो ज्या ठिकाणी सद्गुरु हा कर्णधार आहे त्या ठिकाणी तो कुशल नावाड्याप्रमाणे आपली नौका (आपले आयुष्य) पैलतीराला नेऊन सुखरूपपणे लावील यात काहीच संशय नाही. हा ह्या ओळीचा आशय सद्गुरूची लक्षणे अगदी थोडक्यात पण स्पष्टपणे सांगतो आणि म्हणून आजच्या गुरुपौर्णिमेच्या दिवशी तिचे महत्व विशेष आहे."

गुरू पौर्णिमेला व्यास पौर्णिमा असेही म्हणतात असे सांगून व्यासांचे समग्र ग्रंथ लेखन काय होते व त्यामुळे मानवजातीला त्या ग्रंथांच्या आधारे ऐहिक व पारमार्थिक उन्नति कशी करून घेता येते हे सांगून डॉ. परचुरे पुढे म्हणाले, 'आपली संस्कृति सर्वांचे सामाजिक ऋण मानणारी आहे. आपल्या समाजाने देवऋण, पितृ-ऋण, आचार्यऋण अशाप्रकारची ऋणे मानलेली आहेत व ती सर्व फेडण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे असे आपला समाज मानतो. म्हणूनच मानव जातीच्या उन्नतीचा मार्ग दाखविणाऱ्या व्यासांच्यासारख्या गुरूचे स्मरण करून त्यांचे ऋण फेडण्यासाठी आजचा आषाढी पौर्णिमेचा, गुरूपौर्णिमेचा दिवस आपण ठरवून दिलेला असावा ह्यात काहीच नवल नाही ! आपल्या शासनाने देखील आपले भूत-पूर्व राष्ट्रपति सर्वपल्ली राधाकृष्णन् ह्यांचा जन्म दिवस हा गुरूंचा दिवस म्हणून साजरा करण्याचा आदेश दिलेला आहे, आणि तो त्याप्रमाणे प्रतिवर्षी साजरा केला जातो.

ह्यावरून आपली भारतीय परंपरा आपल्या देशात शासकीय स्तरावरही पाळली जाते हेच ह्यावरून दिसते.

"असो, आपण सर्वजण श्री साईबाबांना सद्‌गुरु म्हणून मानतो व आजच्या दिवशी त्यांची पूजा करतो. मी आपणास पूर्वी सांगितलेल्या ओवीप्रमाणे श्रीसाई-बाबांनी आपल्या सर्व भक्तांना अशा तऱ्हेचे मार्गदर्शन केलेले आहे की त्यांचा संसार तर नीट झालाच, पण संसार संभाळून परमार्थ कसा साधावा हे ही त्यांनी आपल्या भक्तांना चांगल्याप्रकारे शिकविले आहे तेव्हा हेमाडपंतांनी सांगितल्या-प्रमाणे श्रीसाईबाबा हे खरे सद्‌गुरु आहेत व आपणा सर्वांना त्यांच्या सारखे सद्‌गुरु लाभावे हे आपले परम भाग्य आहे. तेव्हा आजच्या गुरुपौर्णिमेच्या दिवशी आपण सर्वजण त्यांची पूजा करून त्यांचे ऋण फेडू या व त्यांची शिकवण सदैव आचरणात आणू या." एवढे सांगून डॉ. परचुरे ह्यांनी प्रवचन संपविले.

डॉ. परचुरे ह्यांचे प्रवचन चालू असताना भक्तगण येत होते आणि बाराच्या सुमारास सुमारे शंभराच्यावर भक्त उपस्थित होते. त्या सर्वांनी प्रेमादरपूर्वक व भक्तिभावाने आरती केली व प्रसाद आणि उदी वाटल्यावर सर्वांनी भक्तिरसपूर्ण अंतःकरणाने "श्रीसमर्थ सद्‌गुरु साईनाथ महाराज की जय" असा जयजयकार केला व भक्त आपल्या घरी गेले. आपापल्या सवडीनुसार भक्तगण येऊन दर्शन घेऊन जात होते. संध्याकाळी सात वाजेपर्यंत भक्तांची अखंड रीघ लागली होती व पंधराशे-वर भक्त येऊन त्या दिवशी दर्शन घेऊन गेले असावेत असे वाटते.

☆ ☆ ☆

# -: साईबाबांची शिरडी छान :-

साई बाबांची शिरडी छान ।
भक्त जाती तिथे आनंदान ।
तुम्हा माहित न्हाय, त्याला हवं आहे काय ।
सार्‍या भक्तांचे हो समाधान ॥ ध्रु० ॥

१) भाव तिथे देव अशी संतांची ही वाणी ।
देव भक्तासाठी नेहमी येई हो धावोनि ।
धरा आधी पाय, मागा हवं काय,
राव रंक तिथे हो समान ॥ १ ॥

२) दरबारी साईच्या त्या भक्तजन जाती ।
जाऊनिया शिरडीस पावन हे होती ।
प्रल्हादाचे परी; भक्ति पाहीजे जरी,
साई भक्तांचा होई गुलाम ॥ २ ॥

३) पैसा तिथे प्रित असे जगाची ही रीत ।
म्हणूनच ' संजयाने ' लिहीले हे गीत ।
ऐका युक्ति बरी, मिळेल मुक्ति जरी,
अंती येईल मुखी राम राम ॥ ३ ॥

— कवि गायक —
ज्यु. संजय कुमार झाडे,
ज्यु. संजय गायन पार्टी, लाकडीपुल,
तेलीपुरा, नागपूर.

# श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

## श्रीसाईबाबांचे चित्र काढा व बक्षिस मिळवा

# आंतरराष्ट्रीय बालक वर्षानिमित्त

# श्रीसाईलीला वर्गणीदार हवेच अशी अट नाही

### अभिनव चित्रकला स्पर्धा

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीतर्फे आंतरराष्ट्रीय बालक वर्षानिमित्त एक नाविन्यपूर्ण चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. ही स्पर्धा भारतीय व परदेशांतील सर्व विद्यार्थी मुलामुलींना खुली असून त्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रवेश शुल्क नाही. या स्पर्धेचे तीन गट पाडण्यात आले असून चित्रकारांनी पुढील नियम व अटी पाळून आपआपली चित्रे काढावयाची आहेत.

गट नं. १ : वयोमर्यादा ६ ते ९ वर्षे फक्त : श्रीसाईबाबांचेच पेन्सीलीने काढलेले कोणत्याही अवस्थेतील चित्र, मग ते आशिर्वादात्मक, पाषाणावर बसलेले, साधे बसलेले, शामा घोड्यासमवेत इ. कोणत्याही अवस्थेतील असो.

गट नं. २ : वयोमर्यादा १० ते १६ वर्षे : श्रीसाईबाबांचे गट क्र. १ मध्ये वर्णन केल्याप्रमाणेच कोणत्याही अवस्थेतील पण तीन किंवा चार रंगांनी रंगविलेले चित्र.

नियम : १) सर्व चित्रे १० इंच लांब व ८ इंच रुंद अशा पांढऱ्या ड्रॉइंग पेपरवरच चितारलेली असावीत. चित्र काढताना सुयोग्य मर्यादा चारी बाजूंना सोडावी.

२) चित्रकाराने चित्र पाठविताना चित्राच्या वरील बाजूचे उजव्या कोपऱ्यात आपले संपूर्ण नाव, पत्ता, वय, शिकत असलेली इयत्ता, शिक्षण-संस्थेचे नाव इ. सुस्पष्ट लिहावे. तसेच चित्र स्वतः काढलेले असल्याचा आपल्या गुरुजींच्या सहीचा दाखला अवश्य पाठवावा.

३) एका चित्रकारास स्पर्धेसाठी फक्त एकच चित्र पाठविता येईल.

४) चित्रे पाठविण्याची अखेरची तारीख ३० सप्टेंबर १९७९ ही आहे.

या तारखेनंतर आलेल्या कोणत्याही चित्राचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही.

५) प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय व उत्तेजनार्थ अशी चित्रे निवडली जातील. यशस्वी स्पर्धकांची नावे **श्रीसाईलीला दिवाळी अंक** १९७९ मध्ये जाहीर केली जातील.

६) स्पर्धेसाठी आलेल्या सर्व चित्रांचे प्रदर्शन श्रीसाईबाबा संस्थान शिरडी येथे दिवाळीत भरविले जाईल.

७) यशस्वी चित्रकारांना रीतसर निमंत्रण देऊन त्यांचा जानेवारी १९८० मध्ये भरणाऱ्या **श्रीसाईलीला** लेखक-कवींच्या मेळाव्यात यथोचित सत्कार केला जाईल.

प्रत्येक गटातील प्रथम क्रमांकास रु. ५१, दुसऱ्या क्रमांकास रु. ३१, व उत्तेजनार्थ स्पर्धकास रु. ११ अशी रोख बक्षिसे संमेलन अध्यक्षांचे हस्ते दिली जातील.

८) चित्रे टपालाने किंवा समक्ष पाठवून देण्याचे पत्ते :-

१) मे. कोर्ट रिसीव्हर साहेब, श्रीसाईबाबा संस्थान, मु. पो. शिरडी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर. ( पिन ४२३१०९ )

**किंवा**

२) संपादक, श्रीसाईलीला, साई निकेतन,
८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई-४०० ०१४.

९) चित्रे असलेल्या आवरणांवर "श्रीसाईबाबा चित्र स्पर्धा" असा स्पष्ट उल्लेख करावा.

१०) दोन्ही गटातील प्रथम क्रमांकाची चित्रे श्रीसाईलीला मासिकात यथावकाश छापली जातील.

**श्री क. हि. काकरे**
कोर्ट रिसीव्हर,
**श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी.**

संयोजक
**सदानंद चेंदवणकर**

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

## श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | रु. पै. |
|---|---|
| (१) श्रीसाई सच्चरित्र, (मराठी) | १६–०० |
| (२) श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी) | ६–२५ |
| (३) श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती) | ६–५० |
| (४) श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी) | ७–५० |
| (५) श्रीसाई सच्चरित्र, (कानडी) | ८–०० |
| (६) श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी) | १०–०० |
| (७) गुजराती पोथी (शरणानंद) | ५–५० |
| (८) श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी) | ०–३० |
| (९) श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती) | ०–३० |
| (१०) दासगणूकृत ४ अध्याय, (मराठी) | ०–८० |
| (११) सगुणोपासना, (मराठी) | ०–३० |
| (१२) सगुणोपासना, (गुजराती) | ०–२५ |
| (१३) श्रीप्रधानकृत चरित्र, (इंग्रजी) | २–०० |
| (१४) साईलीलामृत, (मराठी) | ५–०० |
| (१५) सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह) | २–०० |
| (१६) साईबाबा अवतारकार्य, (अ. य. धोंड) | ३–०० |
| (१७) शिर्डीचे श्रीसाईबाबा, (के. भ. गव्हाणकर) | ५–०० |
| (१८) शिर्डी दर्शन (६६ चित्रांचा संग्रह) | ४–५० |
| (१९) मुलांचे साईबाबा, (मराठी) | १–२५ |
| (२०) मुलांचे साईबाबा, (गुजराथी) | १–०० |
| (२१) चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी) | १–५० |
| (२२) मुलांचे साईबाबा (तेलगु) | १–५० |
| (२३) बच्चोंके साईबाबा ( हिंदी ) सदानंद चेंदवणकर | १–०० |
| (२४) साई किर्तनमाला, (मराठी) | १–२५ |
| (२५) साई दी सुपरमन, ले. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी) | ३–२५ |
| (२६) श्रीसाई रूद्राध्याय, (मराठी) | ०–०५ |
| (२७) श्रीसाई गीतांजली, (मराठी) | ०–०५ |
| (२८) गाईड टु शिर्डी, (इंग्रजी) | ०–१० |
| (२९) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, ( मराठी व इंग्रजी ) वार्षिक वर्गणी, | ६–०० |
| ( व्ही. पी. पद्धत नाही. ) प्रत्येक प्रत | ०–६० |